## महायुतीचे ठरले! ५ डिसेंबरला मुंबईत शपथविधी सोहळा



**मुंबई :** राज्यातील महायुती सरकारच्या नव्या इनिंगचा शपथविधी अखेर ठरला आहे. येत्या गुरुवारी म्हणजेच ५ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता नव्या सरकारचा शपथविधी होणार आहे. मुंबईतील आझाद मैदानमध्ये हा सोहळा होणार आहे. महायुती सरकारच्या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहणार आहेत. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही माहिती दिली. राज्यात सर्वाधिक जागा निवडून आलेल्या भाजपकडेच मुख्यमंत्रीपद जाणार हे निश्चित झाले आहे, तर शिवसेना आणि राष्ट्रवादीला उपमुख्यमंत्रीपद मिळणार आहे. भाजपमधून मुख्यमंत्रिपदासाठी देवेंद्र फडणवीसांचे नाव अंतिम झाल्याची माहितीही सूत्रांनी दिली. या संदर्भात २ डिसेंबर रोजी भाजपची बैठक असून त्यामध्ये गटनेता निवडला जाणार आहे.


रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १३५
www.ramprahar.com

रविवार, १ डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


**अंतरंग**


काँग्रेसने तिकीट देऊन वाऱ्यावर सोडले -गोरंट्याल/२

बोर्ली पंचतनमध्ये जबरी चोरी करणारा जेरबंद/५


स्व. धर्मवीर आनंद दिघे चषक क्रिकेट स्पर्धा/८


# लोकसभेला कुणीही ईव्हीएमवरून प्रश्न उपस्थित केले नाहीत -अजितदादा

## ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांचे उपोषण मागे

**पुणे : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या ३१ जागा निवडून आल्या होत्या. आमच्या महायुतीच्या केवळ १७ जागा आल्या. आम्ही तो पराभव मान्य केला, कारण तो जनतेचा कौल होता, पण तेव्हा कुणीही ईव्हीएमवरून प्रश्न उपस्थित केले नाहीत, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख अजित पवार यांनी ईव्हीएमवर शंका उपस्थित करणाऱ्यांना सुनावले आहे.



ज्येष्ठ समाजसेवक व लेखक बाबा आढाव यांनी पुण्यात आत्मक्लेश आंदोलन केले. विधानसभा निवडणुकीत ईव्हीएमचा गैरवापर झाल्याचा संशय त्यांनी उपस्थित केला. राष्ट्रवादीचे प्रमुख अजित पवार यांनी शनिवारी (दि. ३०) आढाव यांच्या आंदोलनस्थळाला भेट दिली व त्यांच्याशी चर्चा करून आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. त्यानंतर पवारांनी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली.

या वेळी अजित पवार म्हणाले, मला बाबा आढाव यांना सांगायचे आहे की, काही गोष्टी या निवडणूक आयोगाशी संबंधित असतात. निवडणूक आयोग ही स्वायत्त संस्था आहे. काही गोष्टी सर्वोच्च न्यायालयाच्या अखत्यारित आहेत. त्यात आम्हाला ढवळाढवळ करता येत नाही. त्यांना जे योग्य वाटते, ते निर्णय त्यांनी दिले आहेत. मी स्वतः बारामतीचा उमेदवार होतो. मी पाहिले आहे की, संध्याकाळी साडेपाच वाजल्यानंतर मतदारांची गर्दी वाढली होती. मी वेगवेगळ्या मतदान केंद्रांवरील अधिकाऱ्यांना सांगितले होते की, सहा वाजेपर्यंत जेवढे मतदार येतील त्या सर्वांसाठी बाहेर विजेची व्यवस्था करा आणि सगळ्यांना मतदान करता येईल याची काळजी घ्या. **(पान २ वर..)**

# उलवे नोडच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन उत्साहात

### मान्यवरांची उपस्थिती

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये शनिवारी (दि. ३०) विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन शकुंतला ठाकूर यांच्या हस्ते झाले.



या प्रदर्शनाला 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, विद्यालयाचे चेअरमन परेश ठाकूर, माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत तसेच अर्चना ठाकूर, 'रयत'चे विभागीय निरीक्षक प्रमोद कोंगेरे, पीआरओ बाळासाहेब कारंडे, डॉ. जे.सी. व्यास आदी उपस्थित होते.

या विज्ञान प्रदर्शनात पूर्व प्राथमिकपासून माध्यमिकपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि सुंदर प्रतिकृती बनवल्या. प्रदर्शनाचे खास आकर्षण होते ते एआय निर्मित रोबो. प्रदर्शनाच्या मध्यभागी आपल्या देशातील राज्यांमध्ये उगवले जाणारे धान्य सजवण्यात आले होते. पूर्व प्राथमिक विद्यार्थ्यांनी एक गाव तयार करून ग्रामीण संस्कृती डोळ्यासमोर उभी केली व त्यासोबत बालकलाकारांनी नृत्यही सादर केले. सांस्कृतिक विभागातर्फे बसवण्यात आलेल्या माईम ॲक्ट (मूक अभिनय)मध्ये विद्यार्थ्यांनी मोबाईल वापराच्या दुष्परिणामाविषयी प्रबोधन केले. मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



## आमदार प्रशांत ठाकूर यांनी घेतले बल्लाळेश्वराचे दर्शन

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत सलग चौथ्यांदा दणदणीत विजय मिळवला आहे. यानंतर त्यांनी पाली येथील अष्टविनायकांपैकी एक असलेल्या बल्लाळेश्वराच्या चरणी नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतला आणि आपल्या समर्थकांचे आभार मानले.



पनवेल विधानसभा मतदारसंघातून कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी एक लाख ८३ हजार ९३१ मते मिळवून विरोधकांवर ५१ हजार ९१ मतांनी विजय मिळवला. या विजयामुळे त्यांचे पनवेलमध्ये स्थान अधिकच मजबूत झाले आहे. त्यांनी आपल्या मतदारसंघातील विकासकामे अधिक जोमाने पुढे नेण्याचा संकल्प केला आहे. जनतेची सेवा अशीच माझ्या हातून घडो, अशी प्रार्थना त्यांनी बल्लाळेश्वराकडे केली. सोबत पदाधिकारी, कार्यकर्ते होते.

### नागपुरात हिवाळी अधिवेशनाची तयारी

**नागपूर :** विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर आता नवे सरकार स्थापन होणार आहे. त्याआधीच हिवाळी अधिवेशनाच्या तारखा समोर आल्या आहेत. १६ ते २४ डिसेंबरमध्ये हे अधिवेशन होण्याची शक्यता आहे. नागपूरमध्ये होणाऱ्या या अधिवेशनात नवनिर्वाचित आमदारांसाठी डिजिटल आसनव्यवस्था असणार आहे. यासाठी काम सुरू आहे.

## निवडक

### अदानींच्या मुद्द्यावरून विरोधकांमध्ये मतभेद

**नवी दिल्ली :** संसदेच्या हिवाळी अधिवेशनात काँग्रेसने उद्योगपती गौतम अदानी यांच्यावर अमेरिकेत लावण्यात आलेल्या कथित लाचखोरीच्या आरोपांवर चर्चा घेण्याची मागणी लावून धरली आहे. यामुळे कामकाज तिसऱ्या दिवशीही विस्कळीत राहिले. यादरम्यान तृणमूल काँग्रेस पक्षाने मात्र काँग्रेसपेक्षा वेगळी भूमिका घेतली आहे. संसदेत तिसरा सर्वात मोठा विरोधी पक्ष असलेल्या टीएमसीने लोकांशी निगडीत महत्त्वाचे मुद्दे मांडता यावेत तसेत त्यांच्यावर चर्चा व्हावी यासाठी सभागृहाचे कामकाज चालू राहावे, अशी इच्छा व्यक्त केली.

### अभिनेता शरद कपूरवर विनयभंगाचा आरोप

**मुंबई :** मनोरंजनसृष्टीत अनेक अभिनेत्यांवर विनयभंगाचे, बलात्काराचे आरोप आहेत. त्यातच आता 'जोश', 'लक्ष्य' यांसारख्या अनेक सिनेमांमध्ये दिसलेला अभिनेता शरद कपूरवर एका महिलेने विनयभंगाचे आरोप केले आहेत. ३२ वर्षीय महिलेने शरद कपूरविरोधात खार पोलिसांत रितसर तक्रारही दाखल केली आहे. आता या आरोपांमध्ये किती तथ्य आहे याचा पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

## आचारसंहिता संपताच एसटी महामंडळात २०८ जागांसाठी भरती

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील विधानसभा निवडणुका संपल्यानंतर आदर्श आचारसंहिता शिथील करण्यात आली आहे. त्यामुळे आता भरती प्रक्रियेचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यानंतर राज्य मार्ग परिवहन विभागाच्या २०८ शिकाऊ उमेदवारांसाठी भरतीची जाहिरात निघाली आहे.

यामध्ये ७५ मोटर मेकॅनिक, ३० शिटमेटल, ३४ डिझेल मेकॅनिक, ३० मेकॅनिक ऑटो इलेक्ट्रीकल ॲण्ड इलेक्ट्रॉनिक, २० वेल्डर, १२ रेफ्रीजरेशन ॲण्ड एअर कंडिशनर रिपेअर, दोन टर्नर, पाच पेंटर जनरल या पदांचा समावेश आहे. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना राज्य परिवहनमध्ये सामावून घेण्याबाबत कोणताही विचार केला जाणार नाही किंवा महामंडळावर घेतले जाईल, तसे कुठलेही बंधन असणार नाही, असे जाहिरातीमध्ये स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी विभागीय कार्यालयात शिकाऊ उमेदवार (महिला/पुरुष) पदांच्या एकूण २०८ रिक्त जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्र असणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. उमेदवारांना अर्ज ऑनलाईन पद्धतीने करायचा असून अर्ज करण्याची शेवटची तारीख १३ डिसेंबर आहे. त्यामुळे इच्छुक व शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांनी लगेचच अर्ज करून भरतीसाठी प्रयत्न करावेत, असे कळविण्यात आले आहे.

**निकष आणि प्रवेश अर्ज शुल्क**

भरतीसाठी पदसंख्या २०८ जागा आहे. शैक्षणिक पात्रता दहावी पास, वयोमर्यादा १८ ते ३३ वर्षे असून अर्ज शुल्क एससी, एनटी, पीडब्ल्यूबीडी उमेदवारांसाठी २९५ रुपये व इतर सर्व उमेदवारांसाठी ५९० रुपये आहे. अर्ज पद्धती ऑनलाईन आहे. त्यासाठी https://msrtc.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

# नवीन पनवेलमधील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट प्रशिक्षण केंद्राचे काम प्रगतिपथावर

## माजी सभागृह नेते परेश ठाकूर आणि क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकरांनी केली पाहणी





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेलमधील आदई सर्कलजवळील राजीव गांधी मैदानात पनवेल महापालिकेच्या वतीने आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येत आहे. या केंद्राचे काम वेगाने सुरू असून शनिवारी (दि. ३०) महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर आणि सुप्रसिद्ध क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर यांनी अधिकाऱ्यांसह तेथे पाहणी करून कामाचा आढावा घेतला तसेच कामासंदर्भात आवश्यक त्या सूचना केल्या.



पनवेल महापालिकेच्या वतीने प्रभाग समिती ब, प्रभाग क्रमांक १६मधील भूखंड क्रमांक २८वर आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येत आहे. या प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षण देण्यासाठी दिलीप वेंगसरकर फाउंडेशनशी करार करण्यात आला आहे.

या क्रिकेट प्रशिक्षण केंद्राचे काम वेगाने सुरू आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर आणि सुप्रसिद्ध क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर यांनी केंद्राची पाहणी केली. या वेळी महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती संतोष शेट्टी, माजी नगरसेवक समीर ठाकूर, महापालिकेचे अधिकारी संजय कटेकर तसेच किशोर चौतमोल, देवराम शार्दुल आदी उपस्थित होते.

# राज्यस्तरीय अकरावी अटल करंडक एकांकिका स्पर्धा रंगणार

## ■ विजेत्या एकांकिकेला एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून यंदा या स्पर्धेचे ११वे वर्ष आहे. या स्पर्धेतील विजेत्या एकांकिकेला एक लाख रूपये आणि मानाचा अटल करंडक देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

नाट्य चळवळ वर्द्धींगत करण्यासाठी व नाट्यरसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा पुढे चालत रहावा यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी रंगमंच आमचा कलाविष्कार तुमचा हे ब्रीदवाक्य घेऊन अटल करंडक एकांकिका या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे व हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे देखणे व नेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परीक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे ही स्पर्धा नाट्यरसिकांच्या गळ्यातील ताईत बनली आहे.

राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धा

गौरव रंगभूमीचा...!

या स्पर्धेची प्राथमिक फेरी नाशिक केंद्रावर १३ डिसेंबर, जळगाव केंद्रावर १४ व १५ डिसेंबर, पुणे केंद्र १९ ते २२ डिसेंबर, रायगड (पनवेल) २५ डिसेंबर तसेच मुंबई, ठाणे, कल्याण व इतर (पनवेल) केंद्राची प्राथमिक फेरी २६ ते २९ डिसेंबरपर्यंत होणार आहे, तर अंतिम फेरी १० ते १२ जानेवारी २०२५ रोजी पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे.

या एकांकिका स्पर्धेत राज्यभरातून १००हून अधिक एकांकिकांचा सहभाग असतो. नवनवीन संकल्पना आणि दर्जेदार एकांकिका सादर होत असल्याने हा करंडक महाराष्ट्रभर प्रसिद्ध झाला आहे. स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आवाका वाढला आहे. या स्पर्धेतील विजेत्या प्रथम क्रमांकास एक लाख रुपये, प्रमाणपत्र व मानाचा अटल करंडक, द्वितीय क्रमांक ७५ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक ५० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक २५ हजार रूपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ दोन बक्षिसे प्रत्येकी १० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह तसेच इतरही वैयक्तिक पारितोषिके देऊन कलाकारांना सन्मानित करण्यात येणार आहे.

या स्पर्धेचा नाट्य संस्था, कलाकारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, स्पर्धा प्रमुख व पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केले आहे.

### हायब्रिड मॉडेलसाठी पाकिस्तान झाले राजी!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

गेल्या काही दिवसांपासून बीसीसीआयच्या मागणीच्या विरोधात भूमिका घेणाऱ्या पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने अखेर आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी हायब्रिड मॉडेल मान्य केले आहे.

प्रस्तावानुसार भारतीय संघाचे सर्व सामने आणि सेमी फायनल, फायनल लढत दुबईमध्ये खेळवण्यात येणार आहे, पण जर भारतीय संघ सेमी किंवा फायनलपर्यंत पोहचला नाही तर या लढती लाहोरमध्ये घेण्याची परवानगी मिळावी, अशी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाची अट आहे. याशिवाय आयसीसीने यापुढे समान निवाडा करावा, असे म्हणत २०३१पर्यंत हाच फॉर्म्युला कायम ठेवावा, अशीही अट पीसीबीने घातली आहे.

## महाडमध्ये एकाच इमारतीतील पाच बंद फ्लॅट फोडले

### दागिने आणि इतर ऐवज चोरला; गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

थंडीचा महिना सुरू होताच चोरटे सक्रिय झाले आहेत. उरणमधील वेश्वी येथे चार ठिकाणी घरफोडी झाल्याची घटना ताजी असतानाच महाड तालुक्यातील नातेखिंडजवळील एका इमारतीमधील पाच फ्लॅट अज्ञात चोरांनी फोडून दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली आहे. या प्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

गुन्हे

महाड शहर पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार महाड-रायगड मार्गावरील नातेखिंडजवळ असलेल्या साई आशा या इमारतीमध्ये शुक्रवारी रात्री अज्ञात चोरट्यांनी इमारतीतील सहा फ्लॅट फोडले. तेथील रहिवासी कामानिमित्त बाहेर गेले होते.

चोरी झालेल्या रहिवाशांमध्ये अस्मिता बळीराम महाडिक, प्रभाकर मालुसरे, प्रियांका भगत, अमित पवार, गणेश सुंभे, सुजाता सचिन गायकर यांचा समावेश आहे. या प्रकरणी महाड शहर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# काँग्रेसने तिकीट देऊन वाऱ्यावर सोडले

## माजी आमदार कैलास गोरंट्याल यांचा पक्षाला घरचा आहेर

**मुंबई : प्रतिनिधी**

काँग्रेसने आम्हाला फक्त तिकीट दिलं आणि नंतर प्रत्येकाला वाऱ्यावर सोडून दिलं असा आरोप जालन्यातील काँग्रेसचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी केला.



प्रदेश काँग्रेस कमिटीने ज्या पद्धतीने इलेक्शन लढायला पाहिजे होते त्या पद्धतीने लढले नाही, आम्हाला पक्षाकडून कुठलाही रिस्पॉन्स मिळाला नाही असा आरोपही कैलास गोरंट्याल यांनी केला. जालना मतदारसंघात काँग्रेसच्याच काही लोकांनी गद्दारी केली असल्याचा आरोपही त्यांनी केला. जालना विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या कैलास गोरंट्याल यांना पराभवाचा धक्का बसला. शिवसेना शिंदे गटाच्या अर्जुन खोतकरांनी त्यांचा पराभव केला आहे.

काँग्रेसने एकही सभा घेतली नाही. जी काही सामग्री द्यायला पाहिजे होती ती दिली नाही. वरून पक्षातल्या काही लोकांनी गद्दारी केली. त्यांची आपण वरिष्ठ पातळीवर तक्रार केली आहे असं कैलास गोरंट्याल म्हणाले.

विरोधकांनी धार्मिक ध्रुवीकरण केल्याचे दिसून आले. त्यामुळे हिंदूंमध्ये भिती निर्माण झाली आणि विरोधकांना त्याचा फायदा झाला. त्याचवेळी काँग्रेसची पारंपरिक व्होट बँक मात्र विभागली गेली. त्यामुळे आपला पराभव झाल्याचे कैलास गोरंट्याल म्हणाले.

## नाना पटोलेंवरील आरोपावरून बंटी शेळके यांच्यावर कारवाई?

**नागपूर : प्रतिनिधी**

नागपूर विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार आणि युवक काँग्रेसचे राष्ट्रीय महासचिव बंटी शेळके यांनी केलेल्या आरोपावरून पटोले यांनी त्यांच्यावर वेगळा औषधोपचार करू, असे सांगून गंभीर कारवाईचे संकेत दिले होते.

काँग्रेसने मुंबई येथे घेतलेल्या पराभूत आमदारांच्या बैठकीत शेळके यांनी पटोले यांच्या उपस्थितीतच त्यांच्यावर आरोप केला होता. त्यानंतर त्यांनी उघडपणे प्रसिद्धी माध्यमांसमोर जाऊनही आरोपांचा पुनरुच्चार केला.

नागपूर विधानसभा मतदारसंघात प्रियंका गांधी यांचा रोड शो झाला. या वेळी पटोले नागपूरातही आले नसल्याचे बंटी शेळके यांनी सांगितले होते. आपल्या पराभवाला पटोले हेच प्रामुख्याने जबाबदार असल्याचाही आरोप बंटी शेळके यांनी केला होता.

## नऊ महिन्यांच्या बाळावर हल्ला

### बेलापूरमध्ये घटना; आरोपी ताब्यात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कुऱ्हाड घेऊन महिलेला मारायला गेलेला एका शेजाऱ्याने नऊ महिन्यांच्या बाळावर हल्ला केल्याची निर्घृण घटना बेलापूरमध्ये घडली आहे. या आरोपीला पकडण्यात नवी मुंबईतील एनआरआय पोलिसांना यश आला आहे.

बेलापूर गावात गुरुवारी एक महिला आणि रहिवासी यांच्यातील हिंसक स्वरूपाचे वाद झाले. या वादाचे रूपांतर निर्घृण हल्ल्यात झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या नराधमाने महिलेवर कुऱ्हाडीने वार करून तिच्या नऊ महिन्यांच्या मुलाला जबर जखमी केले, हाणामारीदरम्यान लहान मुलाच्या चेहऱ्यावर वार करण्यात आल्याने त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

बेलापूर गावात मोठ्या प्रमाणावर भीती निर्माण करणारा हा संघर्ष स्मशानभूमीसमोरील एका झोपडपट्टीजवळ घडला. मिळालेल्या माहितीनुसार, महिला आणि आरोपीमध्ये पूर्वीपासून वाद होता. या पूर्वीच्या भांडणाचे रूपांतर हाणामारीत झाले. आरोपीने यापूर्वीही महिलेवर लोखंडी रॉडने हल्ला केल्याचीही माहिती समोर आली आहे. घटनेच्या दिवशी, महिलेच्या दाराजवळ कचरा टाकल्याचा किरकोळ कारणावरून हाणामारी झाली.

या वेळी आरोपीने महिलेवर हल्ला केला आणि त्यानंतर झालेल्या गोंधळात, लहान मुलावर कुऱ्हाडीने वार केले, ज्यामुळे त्याला गंभीर दुखापत झाली आहे. या आरोपीला पकडण्यात पोलिसांना यश आले आहे.

## भारतीय रेल्वेचे संरक्षा ॲप लॉन्च

**रोहे : प्रतिनिधी**

रेल्वे बोर्ड ऑपरेशन्स आणि बिझनेस डेव्हलपमेंट सदस्य रविंदर गोयल यांनी आज सर्व विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम), प्रधान मुख्य परीचालन व्यवस्थापक (पीसीओएम), प्रधान मुख्य वाणिज्यिक व्यवस्थापक (पीसीसीएम) आणि भारतीय रेल्वेच्या सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संरक्षा मोबाईल ॲप लाँच केले.

२०१३च्या बॅचचे आईआरटीएस अधिकारी श्री दिलीप सिंग यांनी हे ॲप डिझाइन केले आहे. जे सध्या दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर येथे वरिष्ठ विभागीय वाणिज्यिक व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. या वेळी नागपूर विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) नमिता त्रिपाठी यांनी नागपूर विभागात पथदर्शी प्रकल्प राबविण्याबाबत आणि विभागातील सुरक्षा वाढविण्यासाठी तो कसा उपयुक्त ठरला आहे याबद्दल सांगितले. आता रेल्वे बोर्डाने हे प सर्व विभागीय रेल्वेमध्ये लॉन्च करण्याचा निर्णय घेतला आहे ज्यात सुरुवातीला रोलआउटसाठी १६ विभाग निवडले गेले आहेत.

हे प्लिकेशन भारतीय रेल्वेच्या डोमेन ज्ञानाला माहिती तंत्रज्ञान, डेटा नालिटिक्स आणि एआई च्या संभाव्य फायद्यांसह समाकलित करते ज्यामुळे रेल्वे कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षण आणि क्षमता वाढीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी एक बुद्धिमान, प्रभावी आणि स्केलेबल प्रणाली प्रदान केली जाते. यात स्मार्ट लर्निंग आणि फीडबॅक मेकॅनिझम आहेत जे बहुस्तरीय, रिअल-टाइम फीडबॅक आणि मॉनिटरिंग सक्षम करतात.

## अनधिकृत हातगाड्यांवर कारवाई करण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील मार्केट यार्ड व महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत हातगाडी व्यवसायामुळे मोठ्या प्रमाणात रहदारीस अडथळा होत आहे. बेकायदा हातगाड्यांवर कारवाई करण्याची मागणी हिंदवी सेनेने पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, पनवेल शहरातील मार्केट यार्ड व अनेक ठिकाणी अनधिकृत हातगाडी व्यवसायावाले रहदारीस अडथळा करून आपल्या हातगाड्या उभ्या करून ठेवतात. तसेच विना परवाना हातगाडीवर फळे व भाजी विक्री करीत आहेत. यामुळे वाहतूक कोंडी होत आहे तसेच अनेक ठिकाणी बांगलादेशी नागरिक हे हा व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास येत आहे. तरी या संदर्भात तातडीने कारवाई करण्याची मागणी हिंदवी सेना यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## जेएनपीएतर्फे प्रमुख बंदरांच्या सचिवांची परिषद



**उरण : बातमीदार**

भारतातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरणाने (जनेप प्राधिकरण) शुक्रवारी, २९ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रमुख बंदरांच्या सचिवांच्या परिषदेचे आयोजन केले होते. या दोन दिवसीय परिषदेत प्रमुख बंदरांचे प्रतिनिधी आणि पत्तन, नौवहन आणि जलमार्ग मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते.

या परिषदेचे उद्‌घाटन जनेप प्राधिकरणाचे अध्यक्ष उन्मेष शरद वाघ यांनी नौवहन आणि जलमार्ग मंत्रालय पत्तन संयुक्त सचिव संदीप गुप्ता, संचालक (पीएचआरडी) पी. के. रॉय आणि महाव्यवस्थापक (प्रशासन) मनीषा जाधव आणि जनेप प्राधिकरण सचिव या मान्यवरांच्या उपस्थितीत केले.

भाषणात अध्यक्ष उन्मेष शरद वाघ यांनी बंदर क्षेत्रातील सहकार्य आणि नवोन्मेषासाठी जनेप प्राधिकरणाचे समर्पण अधोरेखित केले. सर्वसमावेशक नेतृत्वाचे महत्त्व अधोरेखित करताना ते म्हणाले, एक सुलभ नेतृत्व संच कर्मचाऱ्यांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण करतो, ज्यामुळे त्यांना आपल्याही महत्व दिले जात असल्याची आणि आपले ऐकले जात असल्याची भावना निर्माण होते.

या अधिवेशनाच्या माध्यमातून, कर्मचाऱ्यांसाठी प्रमोशनल कॅलेंडर तयार करणे, प्रशिक्षण वेळापत्रक तयार करणे आणि आंतरराष्ट्रीय पत्तनांसह सहयोगी विनिमय कार्यक्रम शोधणे यासारख्या प्रमुख विषयांवर लक्ष केंद्रित करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. नियमित अधिवेशने आणि वार्षिक विभागीय परिषदा या उपक्रमाला आणखी समृद्ध करतील.

## फुंडे हायस्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन उत्साहात

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात शुक्रवारी (दि.२९) शालेय विज्ञान प्रदर्शन झाले.

विज्ञान प्रदर्शन विभाग प्रमुख के. एस. मुकादम आणि सहायक जे.सी. भोपी यांनी या विज्ञान प्रदर्शनाचे नियोजन केले होते. इयत्ता पाचवी ते आठवी आणि इयत्ता नववी ते बारावी अशा दोन गटात प्रकल्प मांडणी करण्यात आली होती.

ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख व्ही. के. कुटे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्‌घाटन व प्रतिमा पूजन झाले. या वेळी एच. एन. पाटील, नितिन म्हात्रे, साधना पाटील, नितिन ठाकूर आणि सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी वाहतूक सुरक्षा, दळणवळणाची साधने, कचरा व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या विषयावर प्रकल्प मांडणी केली होती.



मुकादम मॅडम व आर. एन. पाटील यांनी लहान गटाचे परीक्षण केले तर एम. एम.खारपाटील व अस्मिता पाटील यांनी मोठ्या गटाचे परीक्षण केले. लहान गट पाचवी ते आठवीमध्ये प्रथम क्रमांक श्रेया उत्तम मंडळे व पृथ्वीराज संभाजी शिंदे, द्वितीय क्रमांक चिन्मय नितीन गवळी, तृतीय क्रमांक लोकेश प्रदीप मसे, उत्तेजनार्थ कुमारी स्वरांजली सुधीर गोरे या विद्यार्थ्यांनी पटकावला.


मोठ्या गटात म्हणजे इयत्ता नववी ते बारावी या गटात प्रथम क्रमांक कार्तिक संदीप फडके, द्वितीय क्रमांक शर्वरी शिरीष पाटील, तृतीय क्रमांक प्रणिता जगदीश पाटील या विद्यार्थ्यांनी मिळविला तसेच या प्रदर्शनात गणित मॉडेलसुद्धा मांडण्यात आले होते.


यामध्ये प्रथम क्रमांक अमृता संजय जाधव व वेदिका धर्मेंद्र पाटील तर द्वितीय क्रमांक अक्षरा बाळासो सावंत या विद्यार्थिनी पटकावला सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे व सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

## हभप निवृत्तीबुवा चौधरी यांचा सहस्त्रचंद्र सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बालयोगी श्री. सदानंद महाराज आश्रम संस्थेच्या वतीने रायगड जिल्ह्यातील पनवेल येथील नादब्रम्ह साधना मंडळाचे संस्थापक तथा विख्यात शास्त्रीय व भजन गायक ह.भ प. निवृत्तीबुवा चौधरी यांचा सहस्त्रचंद्र सोहळा गुरुवारी (दि.५) दुपारी ३. ३० वाजता ठाणे जिल्ह्यातील श्रीक्षेत्र गणेशपुरी येथे आयोजित करण्यात आला आहे.





नवी, मुंबई, रायगड, ठाणे, मुंबई तसेच राज्यातील परिसरात ह. भ. प. निवृत्तीबुवा चौधरी यांनी शास्त्रीय संगीत व भजन संगीतच्या प्रचार व प्रसारासाठी अपार मेहनत घेतली आहे. ६० वर्षेहून अधिक काळ त्यांनी या क्षेत्राची सेवा केली आहे. त्यांनी या क्षेत्रातून अनेक हजारो शिष्य घडविले आहेत. त्यांच्या या शिकवणीतून तयार झालेल्या कलाकारांनी आपले नाव उंचावले आहे. ह. भ. प. निवृत्तीबुवा चौधरी यांचे संगीत क्षेत्रातील कार्य समाजाला नेहमी मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरले आहे. त्या अनुषंगाने त्यांचा ह.भ.प. निवृत्तीबुवा चौधरी यांचा सहस्त्रचंद्र सोहळा बालयोगी श्री. सदानंद महाराज आश्रम संस्थेच्या वतीने होणार आहे.

## गुड मॉर्निंग कट्टातर्फे निराधार महिलेस मदत

**उरण : वार्ताहर**

उरण उरण नगर परिषदेचे विमला तलाव येथे असलेल्या गुड मॉर्निंग कट्टाच्या वतीने शनिवारी (दि. ३०) एक गरीब निराधार महिलेस दीड हजार रुपये मदत देण्यात आली.

ही गरीब व निराधार राणीमा महिला देवूळवाडी येथे राहत असून तिला कोणत्याही प्रकारचा आधार नाही. तिला ही मदत दीड वर्षापासून प्रतिमहिना देण्यात येते, असे गुड मॉर्निंग कट्टाच्या सदस्यांनी सांगितले. ही मदत सदस्य ऐच्छिक वर्गणी गोळा करून करण्यात येते.



गेली बारा वर्षांपासून गुड मॉर्निंग कट्टा विविध उपक्रम राबवीत आहे. ज्येष्ठ नागरिकांना शारीरिक तंदुरीस्तीसाठी, व्यायाम, योग, मेडीटीशियन, आहार याचे मोफत मोलाचे मार्गदर्शन करीत आहेत. त्याचप्रमाणे डॉक्टर, पोलीस, समाजसेवक, खेळाडू पत्रकार यांचे मोलाचे मार्गदर्शन दिले जाते. सभासदांचा वाढदिवस महिन्याच्या शेवटच्या तारखेला साजरा केला जातो.

या वेळी सुबोध दर्णे, सुर्यकांत दांडेकर, उल्हास मोकाशी, प्रकाश पाटील, हर्मन फर्नांडीस, प्रवीण म्हात्रे, सुनील घरत, मच्छिंद्र घरत, रफिल, साहेबराव ओहळ, जगदीश तांडेल, दिनेश पवार, महेश पाटील, हरिचंद्र कोळी, देवचंद कोळी, अशोक म्हात्रे, अशोक पालकर, बाबूलाल सांखला, चंद्रप्रकाश मेहता आदी उपस्थित होते.

## डेंग्यूच्या प्रतिबंध शिबिरांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रामध्ये हिवताप अथवा डेंग्यू आजाराचा प्रसार रोखण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या क्षेत्रात आयोजित जनजागृतीपर विशेष आरोग्य शिबिरांना चांगला प्रतिसाद मिळत आहे.

२६ ठिकाणी आयोजित शिबिरांना १३ हजार ५३३ नागरिकांनी भेट दिली असून एक हजार ३१२ रक्त नमुने घेण्यात आले आहेत. अशाप्रकारे नमुंमपा कार्यक्षेत्रात हिवताप अथवा डेंग्यू आजारांबाबत जनजागृती करण्याकरिता ३ ऑगस्ट २०२४ ते २८ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत एकूण २९० जाहीर शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरांचा लाभ एक लाख २८ हजार ६८८ नागरिकांनी घेतला आहे या शिबिरांमध्ये ११ हजार ६४४ रक्त नमुने घेण्यात आले आहेत.

आरोग्य विभागाच्या कार्यवाहीसोबतच नवी मुंबईकर नागरिकांनी आपल्या घरातील व घराभोवतालची डासउत्पत्ती स्थाने नष्ट करणे तसेच आपले घर व परिसर स्वच्छ ठेवावे, घरातील डास उत्पत्ती स्थाने नष्ट करावीत, आजुबाजूचा परिसर अथवा टेरेसवरील भंगार नष्ट करावे, जेणेकरून नवी मुंबईत हिवताप अथवा डेंग्यू आजारांवर आळा घालणे शक्य होईल, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

या शिबिरांच्या ठिकाणी नॉफीलीस व एडीस डासांची उत्पत्तीस्थाने प्रत्यक्षात मॉडलद्वारे दाखवून, तसेच नागरिकांना डासांच्या अळ्या प्रत्यक्ष दाखवून, घराभोवती व घरांतर्गत असणारी संभाव्य डासोत्पत्ती स्थाने दाखविण्यात आली. यामध्ये पाणी साठवून ठेवलेले ड्रम ओढणी, धोतर किंवा साडीच्या कपड्याने बंदिस्त करणे, त्याचप्रमाणे पाणी साठविण्याची भांडी व टाक्या बंदिस्त करणे व आठवड्यातून एक दिवस स्वच्छ करून कोरड्या ठेवणे, भंगार साहित्य व टायर्स इ. नष्ट करणे, छतावरील प्लास्टीक शीट, ताडपत्री यामध्ये पाणी साचू न देणे, ताप येताच त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले तसेच याप्रमाणे अंमलबजावणी करण्याचे आवाहन करण्यात आले.

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्राची भौगोलिक रचना लक्षात घेता नागरी वस्तीलगत असणारा खाडी किनारा व त्याठिकाणचा दलदलीचा परिसर यामध्ये हिवाळा कालावधीत क्युलेक्स डासांची घनता वाढण्याकरिता पोषक वातावरण असल्याने या कालावधीत इतर कालावधीपेक्षा जास्त डास प्रादुर्भाव जाणवतो.

यामुळे २५ नोव्हेंबर २०२४ ते २२ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत आयुक्त महोदयांच्या निर्देशानुसार डासांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी सकाळच्या नियमित धुरीकरणासोबत सायंकालीन धुरीकरण सुरू करण्यात आले आहे.

सकाळचे धुरीकरण हे साप्ताहिक वेळापत्रानुसार नियोजित कार्यक्षेत्रामधील बंद गटारांमध्ये केले जाते तर सायंकालीन धुरीकरण गावठाण, झोपडपट्टी व सोसायटी अंतर्गत मीटर रूम, जिने या ठिकाणी पंधरवडा कार्यक्रमानुसार राबविले जाते. अशाप्रकारची शिबिरे ऑगस्टपासून सातत्याने राबविण्यात येत असून त्यांना नागरिकांचा प्रतिसाद लाभलेला आहे.

## खोपोली-पेण रस्त्यावर दुचाकीस्वाराचा मृत्यू

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली पेण रस्त्यावर वडवळ टोल नाक्याजवळ स्कुटीस्वार नंदू तेलवणे याचा अपघाती मृत्यू झाल्याची घटना शनिवारी (दि.३०) दुपारी बाराच्या सुमारास घडली.



मिळालेल्या माहितीनुसार पेणचे रहिवासी आरटीओ एजंट नंदू तेलवणे आपल्या (एमएच ०६ बीएन ६८०७) स्कूटीवरून खोपोली दिशेकडे येत असताना, वडवळ टोल नाक्याजवळ आले असता त्यांची स्कुटी घसरली व अपघात झाला. त्यांना तातडीने अपघातग्रस्त मदत टीमच्या सदस्यांनी रुग्णवाहिकेतून खोपोली येथील डॉक्टर मोहिते यांच्या रुग्णालयात आणले, परंतु गंभीर दुखापतीमुळे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. याबाबतचा तपास खोपोली पोलीस करीत आहेत

### दुखवटा

## शेवंताबाई देवरे

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे विभाग सहकारी भात गिरणीचे संचालक सुरेश भागोजी देवरे यांच्या मातोश्री शेवंताबाई भागोजी देवरे (वय ९७) यांचे सोमवारी (दि.२५) निधन झाले. मंगळवारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पाच मुले व एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कै. शेवंताबाई देवरे यांचा दशक्रिया विधी गुरुवारी (दि.५) उध्दर-पाली येथे होणार असून उत्तरकार्य विधी रविवारी (दि.८) चिकणी (देऊर) येथील घरी होणार आहे.



पान १ वरुन

## लोकसभेला कुणीही ईव्हीएमवरून प्रश्न उपस्थित केले नाहीत -अजितदादा

माजी उपमुख्यमंत्री पुढे म्हणाले, माझ्या बारामती विधानसभा मतदारसंघात माझा उमेदवार ४८ हजार मतांनी पराभूत झाला, मात्र मी त्याच मतदारसंघात विधानसभा निवडणुकीत एक लाखाहून अधिक मताधिक्याने निवडून आलो आहे, कारण बारामतीच्या जनतेचे पहिल्यापासून ठरलेले लोकसभेला ताई आणि विधानसभेला दादा. त्यानुसारच ते मतदान करतात. लोकसभा निवडणुकीत ज्या गावांमधून आम्हाला मतदान मिळाले नाही, तिथे मला विधानसभेच्या वेळी भरभरून मतदान मिळाले आहे. आता पाच महिन्यांत जनतेचा कौल बदलला याला आम्ही काय करणार?

१९९९च्या निवडणुकीवेळी बारामतीमधील मतदारांनी शरद पवार यांना लोकसभा निवडणुकीत ८५ हजार मतांनी जिंकवले होते. मला त्या वेळी केवळ ५० हजार मतांची आघाडी मिळाली होती, परंतु तेव्हा मी त्यावेळी निवडणूक प्रणालीवर संशय व्यक्त केला नव्हता, असेही अजित पवार यांनी नमूद केले.

राष्ट्रवादीचे प्रमुख अजित पवार यांच्याबरोबरच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनीही बाबा आढाव यांची भेट घेऊन त्यांचे मत जाणून घेतले. शेवटी आढाव यांनी आपले उपोषण मागे घेत असल्याचे जाहीर केले.

## निवडक

### श्वानमालकावर गुन्हा दाखल

**पनवेल :** लहान मुलाला कुत्रा चावल्याप्रकरणी श्वानमालक तरुणीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नवीन पनवेल येथे गुरुवारी हा प्रकार घडला आहे. १२ वर्षीय मुलगा रस्त्याने जात असताना मोकळा सोडलेल्या श्वानाने त्याच्यावर हल्ला करत लचका तोडला. नवीन पनवेल सेक्टर १ येथे गुरुवारी सकाळी हा प्रकार घडला आहे. परिसरात राहणारा १२ वर्षीय मुलगा रस्त्याने जात होता. त्या वेळी परिसरातील एका कुटुंबाने पाळलेला श्वान रस्त्यावर मोकळा सोडला होता. या श्वानाने या मुलावर हल्ला करत चावा घेतला.

### उरणमध्ये आज रक्तदान शिबिर

**उरण :** सद्गुरु श्री अनिरुद्ध उपासना केंद्र उरण व मुळेखंड यांच्या वतीने रक्तदान शिबिर डॉ.नानासाहेब धर्माधिकारी, उरण नगर परिषद शाळा क्र.१ पेन्शनर पार्कसमोर रविवारी (दि.१) सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत असेल. या शिबिरास दिलासा मेडीकल ट्रस्ट ॲण्ड रीहॅबिलीटेशन सेंटर श्री अनिरुद्ध आदेश पथक, अनिरुद्ध समर्पण पथक यांचे सहकार्य मिळणार आहे.

# उरणमध्ये बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई

## रस्त्यावरील अपघातास आळा घालण्यासाठी दंड

**उरण : प्रतिनिधी**

उरण वाहतूक शाखेच्या वतीने विशेष मोहीम आखून आत्तापर्यंत मोटर वाहन कायद्याखाली एकूण तीन हजार ३१० वाहनचालकांविरुद्ध विविध कलमाखाली दंडात्मक कारवाई करण्यात आली असून संबंधित वाहनचालकांना एकूण ३० लाख २६ हजार २५० एवढ्या रकमेचा दंड आकारण्यात आला आहे.



या कारवाई अंतर्गत विदाऊट हेल्मेट दुचाकी वाहन चालवणाऱ्या १४७ चालकाविरुद्ध, तसेच रस्त्यावर चुकीच्या ठिकाणी चार चाकी व अवजड वाहने रस्त्यावर उभी करून रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्या दोन हजार ७२७ वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. मद्य प्राशन करून वाहन चालवणारे वाहनचालकांवर एकूण नऊ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली आहे. उरण वाहतूक शाखेच्या हद्दीत जड अवजड वाहनांचे वाहन चालक, रिक्षा टॅक्सी चालक-मालक, सीएफएस व एमटी गोदाम तसेच शालेय बैठक घेऊन प्रबोधन करून जनजागृती करण्यात आली आहे. आत्तापर्यंत मोटर वाहन कायद्याखाली एकूण दोन हजार ४५० वाहन चालकाविरुद्ध विविध कलमाखाली दंडात्मक कारवाई करण्यात आली असून संबंधित वाहनचालकांना एकूण २४ लाख ५० हजार एवढ्या रकमेचा दंड आकारण्यात आला आहे.

या कारवाई अंतर्गत विनाहेल्मेट दुचाकी वाहन चालवणाऱ्या ९५० चालकाविरुद्ध, तसेच रस्त्यावर चुकीच्या ठिकाणी चार चाकी व अवजड वाहने पार्क करून रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्या एक हजार २५० वाहन चालकाविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

उरण वाहतूक शाखा परिसरातील वाहनचालकांनी महामार्ग तसेच अंतर्गत रस्त्यावर वाहने चालवताना स्वतःचे व इतरांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून मोटर वाहन कायद्याचे पालन करावे, असे आवाहन उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांनी केले आहे.

**जेएनपीए, उलवे परिसरातील वाहनचालकांनी महामार्ग तसेच अंतर्गत रस्त्यावर वाहने चालवताना सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून मोटर वाहन कायद्याचे पालन करावे.**
**-जी.एम. मुजावर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, न्हावा शेवा वाहतूक**

## पनवेलमध्ये वाहतूक नियमांबाबत जनजागृती

**पनवेल :** सध्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत चाललेली असून वाहतुकीच्या नियमाचे उल्लंघन करताना वाहन चालक दिसून येत आहेत ही बाब लक्षात घेऊन पनवेल वाहतूक पोलीस शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी पनवेल शहरामध्ये वाहतुकीच्या नियमाची जनजागृती करण्यास सुरुवात केली.

वाहनचालकांना हेल्मेट वापरणे, दारू प्राशन करून गाडीने न चालवणे, सीट बेल्ट बेल्ट वापरणे, सिग्नल जंप न करणे इत्यादी बाबत फलक दाखवून जनजागृती करण्यात आली या वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील, पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने व स्टाफ सहभागी होते.



## उरणमध्ये आरोग्य व रक्तदान शिबिर

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी, वार्ताहर**

न्हावा शेवा सी.एच.ए आधार सामाजिक संस्थेतर्फे रविवारी (दि.१) सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोन, उरण येथे पनवेल हॉस्पिटल (पनवेल)यांच्या सहकार्याने आरोग्य शिबीर, आर झूनझूनवाला शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल तर्फे मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया तर तेरणा ब्लड सेंटर तेरणा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल नेरूळ नवी मुंबई यांच्या सहकार्याने भव्य दिव्य असे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

आज नागरिकांना आरोग्याच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात विविध समस्या भेडसावत असल्यामुळे कमीत कमी वेळेत चांगले सुविधा देऊन नागरिकांचे आरोग्य सुधारण्याचा दृष्टिकोनातून व आरोग्य विषयक जनजागृती करण्याच्या दृष्टीने या भव्य दिव्य अशा आरोग्य शिबिराचे व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांनी या आरोग्य शिबिराचा मोठ्या प्रमाणावर लाभ घ्यावा तसेच इच्छुक रक्त दात्यांनी मोठया प्रमाणात रक्तदान करावे, असे आवाहन न्हावा शेवा सीएचए आधार सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रुपेश भगत यांनी जनतेला केले आहे. नागरिकांनी येताना आपले सर्व जुने रिपोर्ट तसेच आधार कार्ड, पिवळे / केसरी रेशन कार्ड सोबत आणावे, असेही आवाहन त्यांनी जनतेला केले आहे.

अधिक माहितीसाठी रुपेश भगत (९६१९३९५२९२), हनुमान म्हात्रे (९८६७८८६४८०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## चिमुकलीसोबत वृद्धाचे अश्लिल चाळे

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल भागातील घरगुती डे-केअरमध्ये जाणाऱ्या पाच वर्षीय मुलीसोबत घरातील ७८ वर्षीय वृध्दाने अश्लिल चाळे केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकारानंतर पनवेल शहर पोलिसांनी या वृध्द व्यक्ती विरोधात विनयभंगासह पोक्सो कलमानुसार गुन्हा दाखल केला आहे तसेच पुढील कार्यवाही सुरू केली आहे.




या प्रकरणातील आरोपी ७८ वर्षीय वृध्द व्यक्तीची सून त्यांच्या घरामध्ये घरगुती डे-केअर चालवते. तसेच त्यांची सून आपल्या घरामध्ये खाजगी शिकवणी सुध्दा घेते. याच डे-केअरमध्ये पनवेलमध्ये राहणारे डॉक्टर दाम्पत्य आपली पाच वर्षीय मुलगी आणि तीन वर्षांचा मुलगा या दोघांना पाठवत होते. ऑक्टोबर महिन्यामध्ये डॉक्टर दाम्पत्याला दोन दिवस रात्रपाळीवर कामाला जायचे असल्याने त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना दोन्ही वेळेस रात्रीच्या सुमारास या डे-केअरमध्ये ठेवले होते. यादरम्यान रात्रीच्या वेळेस घरातील वृध्द व्यक्तीने डॉक्टरच्या पाच वर्षीय पिडीत मुलीसोबत अश्लिल चाळे केले.

हा प्रकार पिडीत मुलीने आपल्या आई-वडिलांना सांगितल्यानंतर त्यांनी तिच्याकडे सखोल विचारपूस केल्यानंतर नानुने तिच्यासोबत रात्रीच्या वेळी दोन वेळा अश्लिल चाळे केल्याचे सांगितले. त्यानंतर डॉक्टर दाम्पत्याने पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी ७८ वर्षीय वृध्द व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करून पुढील कार्यवाहीला सुरुवात केली आहे.



**उरण : जासई गावचे भाजपा युवा कार्यकर्ते विशाल केशव म्हात्रे यांना वाढदिवसानिमित्त आमदार महेश बालदी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी डी.पी.सोनावणे, कामगार नेते सुरेश पाटील, श्रीकांत राय, मयूर म्हात्रे, कुमार घरत, राकेश म्हात्रे, अमृत ठाकूर व भाजप कार्यकर्ते आदी उपस्थित होते.**

## अखंडित वीजसेवा पुरविण्याची मागणी

**उरण : बातमीदार**

विजेचा वापर आता सर्वत्र मोठ्या प्रमाणात वाढला आहे. दिवसेंदिवस विजेची मागणी वाढतच चालली आहे, मात्र उरणमध्ये गेली ४ ते ५ दिवस दररोज पहाटे उरण शहरात वीज बंद होत आहे. त्यामुळे अखंडित वीजसेवा पुरविण्याची मागणी नागरिक करीत आहेत.

पहाटे पहाटे वीजपुरवठा बंद होत असल्यामुळे उरण शहरातील नागरिक हैराण झाले आहेत. सारखी दररोज वीज जात असल्याने घरातील टीव्ही, फ्रीज, ऐसी, कुलर आदी उपकरणे बंद पडत आहेत. याचा आर्थिक फटका विनाकारण ग्राहकांना बसत आहे. पहाटे कधी ४ वाजता तर कधी पहाटे ५ वाजता वीज घालवीत असल्याने नागरिकांची मोठया प्रमाणात झोपमोड होत आहे. सारखी वीज जात असल्याने त्याचा परिणाम नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होत आहे. ग्राहकांना वीज बिले वेळेत दिली जातात. पैसे नाही भरले तर मीटर कापून नेले जाते. वीज पुरवठा बंद केला जातो.

**दररोज पहाटे उरण शहरात वीज घालवली जाते. त्याचा नाहक त्रास जनतेला होत आहे. त्यामुळे त्याचा परिणाम मानवी शरीरावर होत आहे. महावितरणतर्फे नियमितपणे, अखंडित वीजपुरवठा झाला पाहिजे.**
**-शुभम उरणकर**, नागरिक, उरण

**सब स्टेशनचा रिलेचा प्रॉब्लेम झाल्याने पहाटे वीज जात होती. काही तांत्रिक कारणेसुद्धा होती. आता कामे पूर्ण झाली असून जनतेला कोणताही त्रास होणार नाही. कुठे बिघाड झाल्यास त्वरित कामे केली जात आहेत.**
**-संदीप चाटे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, उरण महावितरण**




**मोहोपाडा, उरण : विधानसभा निवडणुकीत दुसऱ्यांदा विजय मिळविणारे आमदार महेश बालदी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरू आहे. केळवणे जिल्हा परिषद अध्यक्ष किरण माळी, माजी सरपंच रवींद्र चितळे धनाजी ठोंबरे, योगेश पाटील, भाजप उरण तालुका सरचिटणीस कैलास भोईर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते अभिनंदन करण्यासाठी उपस्थित होते.**

## तरुणीला मारहाण; आठ जणांवर गुन्हा दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पाण्याच्या शुल्लक कारणावरून १८ वर्षीय तरुणीच्या अंगावरील कपडे फाडून तिला मारहाण आणि जातीवरून अपमान केल्याप्रकरणी न्हावा गावातील मेघा पाटील, सत्यवान पाटील, सारा पाटील, सायली पाटील, स्वराज्य पाटील, सचिन पाटील, संगीता पाटील, सुजा पाटील यांच्याविरोधात गुरुवारी न्हावाशेवा पोलीस ठाण्यात ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१८ वर्षीय तरुणीच्या आईला सकाळी मेघा पाटील शिवीगाळ करत होती. या वेळी पीडित तरुणीने आईला काय झाले असे विचारले असता त्यांच्यात वाद सुरू झाला. या वेळी मेघा पाटील ही प्लास्टिकची बरणी घेऊन तिच्या आईच्या अंगावर धावून आली. त्या दोघींमध्ये पीडित तरुणी गेली असता सत्यवान पाटील, सारा पाटील, सायली पाटील, स्वराज्य पाटील, सचिन पाटील, संगीता पाटील, सुजा पाटील हे सर्वजण पीडित तरुणीची आई आणि पीडित तरुणीच्या अंगावर धावून आले आणि त्यांनी पीडित तरुणीच्या अंगावरील कपडे फाडले आणि तिला मारहाण केली तसेच त्यांनी पीडित तरुणीच्या आईलाही शिवीगाळ करून मारहाण केली. या वेळी जातीवरूनदेखील अपमान करण्यात आला.

या प्रकरणी पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

## गर्भाशय मुखाच्या कर्करोगाविषयी मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल डॉक्टर्स वेलफेअर असोसिएशनच्या सदस्यांसाठी गर्भाशय मुखाचा कर्करोग प्रतिबंध, स्क्रीनिंग आणि लसीकरण या विषयावर बीके डॉ. शुभदा नील यांनी सीएमई आयोजीत केली होती. या वेळी बीके डॉ. शुभदा नील यांनी संस्थेचे अध्यक्ष डॉ. शिरीष जोशी, डॉ. श्री आणि अमृतकर, डॉ प्रसन्ना जैन यांचा सत्कार केला. तसेच मोफत HPV DNA ग्रीवा कर्करोग स्क्रीनिंग चाचणीसुद्धा करण्यात आली.



जीवनशैली स्वस्थ असेल तर आपण कॅन्सरसारख्या असाध्य आजारापासून स्वस्तः ला वाचवू शकतो असे वक्तव्य नील हॉस्पिटल पनवेल येथे डिवाइन संस्कार रिसर्च फाऊंडेशनद्वारा आयोजित कार्यक्रमात स्त्रीरोग, कॅन्सर आणि गर्भ संस्कार तज्ञ बीके डॉ शुभदा नील यांनी केले. त्यांनी गर्भाशय ग्रीवा आणि स्तन कर्करोग जनजागृतीवर मार्गदर्शन केले.

स्वस्थ जीवनशैली आवश्यक आहे. त्याचप्रमाणे नेहमी शांत, खुश, शक्तीशाली हलके राहिल्याने आपण निरोगी राहू शकतो. गर्भाशय ग्रीवा कर्करोग ह्या आजरापासून बचाव करायचा असेल तर पॅप तपासणी, एचपीपीव्ही तपासणी ह्या सारख्या तपासण्या ३० ते ६० वर्षाच्या महिलांनी करणे आवश्यक आहे. तसेच मुलामुलींना व महिलांना लसीकरण करणे गरजेचे आहे.

नील हॉस्पिटल नवीन पनवेल येथे, महानगर गॅस लिमिटेडच्या एमजीएल आरोग्य प्रोग्राम या सीएसआर प्रकल्पाअंतर्गत एचपीव्ही डीएनए चाचणी २९ ऑक्टोंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत मंगळवार/ बुधवार/ गुरुवार दुपारी १ वाजता तीन हजार रुपयाची टेस्ट मोफत उपलब्ध आहे. स्तन कॅन्सरच्या बचावासाठी दर महिन्याला स्व स्तन परीक्षण, वर्षांतून एकदा डॉक्टरांकडून तपासणी तसेच चाळीशीनंतर सोनोमॅमोग्राफी करणे गरजेचे आहे, असे मार्गदर्शन त्यांनी केले.

## उरणमध्ये भातशेतीची कामे आटोपली

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील भात कापणी बांधणी आणि झोडणीची कामे आटोपली आहेत. अशातच वाढती मजुरी आणि मजुरांची कमतरता भासत असल्याने शेतकरी कुटुंबातील सर्व सदस्य कापणी, बांधणी आणि मळणीच्या कामाला काही ठिकाणी उशीर झाला. ही कामे आता आटोपली आहेत. या कामांसाठी सुशिक्षित तरुण, तरुणींचादेखील सहभाग प्रकर्षाने होता.



निसर्ग चक्राचे बिघडलेले संतुलन आणि अवकाळी पडणारा पाऊस ही भीती शेतकऱ्याच्या मनात असते. अशातच हातातोंडाशी आलेला घास हिरावून जाऊ नये म्हणून शेतकऱ्यांची भात कापणी झोडणीची धावपळ सुरू होती, ही भात शेतीची, कापणी मळणीची कामे काही ठिकाणी अंतिम टप्प्यात आली आहेत, तर काही ठिकणी आटोपली आहेत. भात कापणी मळणीची कामे करण्यासाठी वेळीच मजूर मिळत नसल्याने येथील शेतकरी हवालदिल झाले आहेत. नाईलाजाने शेतकऱ्याने आपल्या कुटुंबातील नातेवाईकांच्या मदतीने भात कापणी झोडणीची कामे केली.

एकेकाळी उरण तालुक्यात भातकापणी झाल्यानंतर भात पिकांची कडवी चार दिवस चांगली वाळल्यानंतरच भाताचे भारे बांधून, ते उडव्यात रचून ठेवले जात असत. त्यानंतर शेतातच खळा तयार करून, त्याचे व्यवस्थित शेणाने सारवण करून, त्यानंतर त्या खळ्यावर मळणीची प्रक्रिया केली जात होती, परंतु सध्याच्या लहरी पावसाच्या भीतीने वर्षभर केलेले कष्ट आणि त्यासाठी केलेला अमाप खर्च वाया जाऊ नये म्हणून, शेतकरी पिके न वाळवताच व त्याची साठवणूक न करताच, ताबडतोब कापलेल्या भात पीकाची मळणी करून, भात घरी आणत आहेत.

उरण तालुका हा भाताचे कोठार समजला जात होता, परंतु मागील काही वर्षापासून येथे औद्योगीकरण वाढल्याने भात शेती लागवडीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर कमी झाले आहे. त्याचबरोबर भातशेती पूर्णतः पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांना कधी ओला दुष्काळ तर कधी सुक्या दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे या भागात भात शेतीकडे दुर्लक्ष झालेले दिसत आहे. अवकाळी पाऊस अतिवृष्टीचा फटका भात शेतीला बसू नये म्हणून शेतकरी मिळेल ते मनुष्यबळ वापरून कापणी मळणीचे कामे करून घेत आहेत, मात्र वेळीच मजूर मिळत नसल्याने भातशेतीची कामे ही लांबवली आहेत.

अजूनही उरण तालुक्यात अनेक शेतकरी पारंपरिक पद्धतीने म्हणजे कापणी यंत्राचा वापर न करता विळाने भात कापणी करून, हाताने झोडणीची कामे करताना दिसत आहेत. पूर्वीसारखे उरण तालुक्यात कापणी, मळणीची कामे करण्यासाठी शेतकरी भल्या पहाटे जातानाचे चित्र या भागात दिसून येत नाही.

### कुटुंबाच्या मदतीने केली जातात कामे

दरम्यान, या भागातील काही शेतकरी शेती टिकून ठेवण्यासाठी सहकुटुंबाची मदत घेऊन शेतीची कामे करताना दिसत आहेत. दिवसेंदिवस महागाईत वाढ झाल्याने मजुरीचे दर वाढले आहेत. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. गोरगरीब शेतकऱ्यांना हे दर परवडणारे नसल्याने घरातील कुटुंबातील तसेच अन्य नातेवाईक कुटुंबांच्या मदतीने आळीपाळीने कापणी व मळणीची कामे शेतकरी करीत आहेत. यात महिला वर्गांचा मोठा सहभाग दिसून येत आहे.

# नवकेतन फिल्म @ ७५

## चित्रपट इतिहासातील मानाचे स्थान



झूम प्रहर



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

मुंबईतील आम्हा चित्रपट समीक्षकांसाठी मराठी चित्रपटांचे विशेष खेळ महालक्ष्मी येथील फेमस स्टुडिओतील मिनी थिएटरमध्ये आयोजित करण्यात येतात त्या प्रत्येक वेळी १४७ क्रमांकाचे कार्यालय मला कायमच खुणावत असते. जुन्या आठवणीत नेत असते. याचं कारण तेथे नवकेतन फिल्म या चित्रपट निर्मिती संस्थेचे स्थापनेपासूनच कार्यालय होते. कालांतराने सत्तर-ऐंशीच्या दशकातील चित्रपट प्रसिद्धीतील आघाडीचे पीआरओ बनी रुबैन यांनी त्याच जागेत आपले प्रशस्त कार्यालय सुरू केले आणि ऐंशीच्या दशकात मी मीडियात आल्यावर मला त्या कार्यालयात जाण्याचा अनेकदा योग येत असतानाच सतत मला नवकेतन फिल्मचे गाईड, तेरे घर के सामने, तेरे मेरे सपने आठवत असत...

नवकेतन फिल्म या चित्रपट निर्मिती संस्थेचे पंचाहत्तरावे अर्थात अमृत महोत्सवी वर्ष सुरू आहे. जुन्या पिढीतील चित्रपट रसिकांसाठी ही अतिशय सुखावणारी गोष्ट. नवकेतन फिल्म या नाव व निर्मिती संस्थेच्या जन्माचा एक किस्सा प्रसिद्ध आहे, चित्रपटाच्या जगात काही वेगळ्या गोष्टी घडतात याचा त्यातून प्रत्यय येतो...

नीचा नगर (१९४९) दुर्दैवाने व्यावसायिकदृष्ट्या अपयशी ठरल्याने दिग्दर्शक चेतन आनंद निराश होणे स्वाभाविकच. दिग्दर्शक हळवे असण्याचे ते दिवस. तो काळ आपल्या चित्रपटाला रसिकांनी नाकारताच त्यातील कलाकार, निर्माता व दिग्दर्शक विलक्षण उदास होण्याचा होता, कारण आपल्या चित्रपटाबाबत विलक्षण आस्था, आत्मियता, प्रेम असे. त्याच वेळेस स्वातंत्र्यप्राप्तीचा आनंद होताच. नवीन उमेद, उत्साह होता. अशातच देव आनंदची अभिनेता म्हणून प्रभात फिल्मच्या हम एक है (१९४६)पासून सुरुवात झाली होती. त्याला आणखी काही चित्रपट मिळत होते आणि अशातच त्याने विजय आनंद व बहिणींनाही गुरदासपुरवरून मुंबईत बोलावून घेतले. तेव्हाची मुंबई वांद्रे, सायनपर्यंत होती.


चेतन आनंदला पुन्हा उभारी देण्यासाठी काय करता येईल या विचारात असतानाच देव आनंदने आपली चित्रपट निर्मिती संस्था निर्माण करायचे ठरवले. काही नवं (नया) करायचे त्याच्या मनात आले आणि तेव्हाच चेतन आनंदची पत्नी उमा हिने मुलाला जन्म दिला. त्याचे नाव केतन.

...आणि मग नवकेतन फिल्म या चित्रपट निर्मिती संस्थेची स्थापना झाली. चित्रपटाचा एक नवा इतिहास जन्माला आला. कंदिल दिवा हे नवकेतनचे बोधचिन्ह. याचं कारण पंजाबमधील गुरदासपुरच्या गावातील घरी बालपणात असलेला रस्ता आणि तेथे अंधुक प्रकाश देत असलेले दिवे. त्यातून जाताना हाती कंदिल ठरलेला आणि पहिला चित्रपट चेतन आनंद दिग्दर्शित अफसर (१९५०) देव आनंद व सुरय्या यांच्या भूमिका. तोही प्रदर्शित होताच अपयशी ठरला.

तो काळ चित्रपट निर्मिती संस्थांचा होता. ते दिवसच वेगळे होते. नवकेतन फिल्मला आपले अस्तित्व निर्माण करून ते टिकवण्यात मोठीच स्पर्धा होती. नवकेतन फिल्मचा गुरुदत्त दिग्दर्शित बाजी (१९५१) यशस्वी ठरला आणि सकारात्मक वाटचाल सुरू झाली. चित्रपटाच्या जगात यश हेच सर्वात मोठे चलनी नाणे, ते आत्मविश्वास देते. आपला फोकस स्पष्ट करते.

चेतन आनंद दिग्दर्शित आंधिया (१९५२), ए.एन. बॅनर्जी दिग्दर्शित हमसफर (१९५३), चेतन आनंद दिग्दर्शित टॅक्सी ड्रायव्हर (१९५४), एम.के. बर्मन दिग्दर्शित मकान नंबर ४४ (१९५५), चेतन आनंद दिग्दर्शित फंटूश (१९५६) असे नवकेतन फिल्मने सातत्य ठेवले. यात चेतन आनंद दिग्दर्शित चित्रपटांचा सहभाग मोठा. यानंतर विजय आनंदने नौ दो ग्यारह (१९५७)पासून चित्रपट दिग्दर्शनात पाऊल टाकले आणि नवकेतन फिल्मचा स्वतःचा प्रेक्षकवर्ग निर्माण झाला. निर्मिती संस्था व त्यांचे चित्रपट हे एक समीकरण असल्याचे ते दिवस. तेव्हाचा चित्रपट रसिक त्यावरून चित्रपटाशी जोडला गेला व अपेक्षा ठेवू लागला. नवकेतन फिल्मने आता




चित्रपट निर्मितीत सातत्य ठेवले आणि आपला जणू विस्तार केला.

राज खोसला दिग्दर्शित काला पानी (१९५८), विजय आनंद दिग्दर्शित कालाबाजार (१९६०), तेरे घर के सामने (१९६३), अमरजीत दिग्दर्शित हम दोनो (१९६१) असे करत करत आर. के. नारायण यांच्या गाईड कादंबरीवर आधारित त्याच नावाचा चित्रपट १९६५ साली आला. चेतन आनंदकडे असलेले दिग्दर्शन विजय आनंदकडे आले आणि एकाच वेळेस हिंदी व इंग्लिशमध्ये पडद्यावर आलेल्या या चित्रपटाने नवकेतन फिल्म, विजय आनंद, देव आनंद, वहिदा रेहमान आणि मुंबईतील या चित्रपटाचे मुख्य चित्रपटगृह मराठा मंदिर या सगळ्यांनाचा प्रतिष्ठा प्राप्त झाली. एक दर्जेदार कलाकृती बरेच काही देत असते. आजही 'गाईड'चे वलय व महत्त्व कायम आहे याचा अनुभव देव आनंदच्या जन्मशताब्दीनिमित्त जुहूच्या मल्टीप्लेक्समध्ये आयोजित करण्यात आलेल्या देव आनंद चित्रपट महोत्सवात आला. खुद्द वहिदा रेहमान या खेळास हजर होत्या आणि आम्ही सगळेच चित्रपट रसिक पुन्हा एकदा गाईड पाहताना रोमांचित झालो होतो. गाईड नवकेतन फिल्मची सर्वोत्कृष्ट कलाकृती. गाईड ऑस्करसाठीची भारताची अधिकृत प्रवेशिका होती. प्राथमिक फेरीत तो बाद झाला म्हणून त्याचे महत्त्व अजिबात कमी होत नाही.

विजय आनंद दिग्दर्शित ज्वेल थीफपर्यंत (१९६७) नवकेतनचा दबदबा होता. त्यात चित्रपटांच्या गुणवत्तेचा मोठाच वाटा. दरम्यान चेतन आनंदनेही आपली हिमालय फिल्म अशी चित्रपट निर्मिती संस्था स्थापन करून आपली स्वतंत्र वाटचाल सुरू केली होतीच. सगळं कसे व्यवस्थित सुरु असतानाच काही अनपेक्षित गोष्टी घडल्या. देव आनंद दिग्दर्शनाचा विचार करू लागला. देव आनंद हा युवा पिढीचा रोमॅन्टीक हिरो आणि आपलं देव आनंद असणं हे पडदाभर छान जपत, मांडत रसिकांवर मोहिनी टाकत होता. गाईड वगळता त्याने आपण देव आनंद आहोत याचा स्वत:ला, रूपेरी पडद्याला आणि रसिकांना अजिबात विसर पडू दिला नव्हता. ही त्याची मोठीच खासियत आणि मिळकत. तरी तो दिग्दर्शनाच्या वाटेला गेला? आपल्यालाही या माध्यम व व्यवसायात एक पाऊल पुढे टाकायचंय असे त्याला वाटावे? स्वत:च्या प्रतिमा व लोकप्रियतेच्या प्रेमात असणाऱ्यांस असे वाटू शकते. तरी बरं धर्मेंद्र, जितेंद्र, राजेश खन्ना, अमिताभ बच्चन, शत्रुघ्न सिन्हा हे निर्माते झाले, पण दिग्दर्शक झाले नाहीत. आपल्या मर्यादा त्यांनी व्यवस्थित ओळखल्या. देव आनंदला ते जमले नाही आणि दिग्दर्शन झेपलेही नाही. आपल्या पहिल्या चित्रपटाचे अंहिसा हे नावही त्याने चित्रपट निर्मिती संस्था इम्पात नोंदवले. चित्रपटावर काम करता करता ते बदलून प्रेम पुजारी केले. पडद्यावर आपल्या केवळ असण्यातही प्रणय करताना पहावे तर ते देव आनंदला. त्यामुळे प्रेम पुजारी परफेक्ट.

दक्षिण मध्य मुंबईतील शालिमार या नवीन चित्रपटगृहाचे प्रेम पुजारीने (१९७०) उद्घाटन. नवकेतन फिल्मचा जणू एक नवीन वा वेगळाच प्रवास (की घसरण?) सुरू झाला. विजय आनंदने नासिर हुसेन यांच्या बॅनरचा तिसरी मंझिल (१९६७) स्वीकारताना नवकेतनबाहेर एक प्रकारे पाऊल टाकले होतेच. चित्रपट वितरक गुलशन रॉय यांनी त्रिमूर्ती फिल्म अशी चित्रपट निर्मिती संस्था स्थापन करताच विजय आनंदने त्यासाठी जॉनी मेरा नाम (१९७०) दिग्दर्शित केला. नवकेतनचा तेरे मेरे सपने (१९७१) मात्र फसला. देव आनंदने हरे राम हरे कृष्णमध्ये (१९७२) दिग्दर्शन चमक दाखवली. विजय आनंदचा मॅकनॉज गोल्डवर आधारित छुपा रुस्तम (१९७३) अगदीच फसला. गोल्डीचा जणू उतार काळ सुरू झाला आणि नवकेतनचाही म्हणायचे?

११ मे १९७३ रोजी इंपिरियल थिएटरला प्रदर्शित झालेल्या प्रकाश मेहरा दिग्दर्शित जंजीरने वातावरण बदलायला सुरुवात केली आणि पुढच्याच शुक्रवारी १८ मे रोजी छुपा रुस्तम आला. काय योगायोग बघा. अमिताभचा ॲन्ग्री यंग मॅनचे आगमन आणि नवकेतन फिल्मचा उतार यांची जणू गाठच पडली. चित्रपट इतिहासातील ही अतिशय दुर्लक्षित तरी खूप महत्त्वाची गोष्ट.

देव आनंद नवकेतनसाठी, तर विजय आनंद अन्य निर्मात्यांसाठी चित्रपट दिग्दर्शित करू लागले. आता नवकेतन फिल्मचे जुने चित्रपट पहावेत ते रिपीट रन, मॅटीनी शो आणि गल्ली चित्रपटात असे झाले. देस परदेसपर्यंत देव आनंद हीरो म्हणून आणि दिग्दर्शक म्हणूनही त्याच्या चाहत्यांना आवडला. नंतर मात्र त्याच्या दिग्दर्शनातील चित्रपटात काय पाहिले हे आठवूनही सांगता येणार नाही. तो त्याचा दिग्दर्शनाचा अट्टाहास होता. मेहबूब स्टुडिओत मुहूर्त आणि मग मुंबईत इकडे तिकडे शूटिंग असताना आम्हा सिनेपत्रकारांना शूटिंग रिपोर्टिंगचे आवर्जून आमंत्रण येऊ लागले आणि लाईव्ह देव आनंद अनुभवायला मी जावूदेखील लागलो. मीडियात असलो तरी या देवाचा भक्त. त्याच्या अव्वल नंबरमध्ये आमिर खान होता हे आज आश्चर्याचे वाटेल. त्या काळातील आमिर खान अनेक सपक चित्रपटात दिसला. आपला चित्रपट पूर्ण होताच देव आनंद पाली हिलवरील झिगझॅक रोडवरील आपल्या आनंद रेकॉर्डिंग स्टुडिओतील सभोवार वजनदार इंग्लिश पुस्तके असलेल्या कार्यालयात दिवसाला एक याप्रमाणेच तास दीड तासाची मुलाखत देई. याचा मी दोनदा छान अनुभव घेतला. पत्रकारितेने मला दिलेल्या सुखद गोष्टीत हीदेखील एक.

खारच्या आपल्या केतनव डबिंग थिएटरमध्ये त्याच्या चित्रपटाची आम्हा काही निवडक पत्रकारांसाठी ट्रायल आयोजित करुन आपलेच कौतुक ऐकून घेणे, चित्रपट प्रदर्शित होताना न्यू एक्सलसियरच्या मिनी थिएटरमध्ये अथवा राजकमल कलामंदिर स्टुडिओत समिक्षकांसाठी खेळ आयोजित करताना स्वत: हजर राहणे (सच्चे का बोलबाला, गॅन्गस्टर, सेन्सॉर वगैरे त्याच्या चित्रपट व दिग्दर्शनावर बोलणार काय? तरी देव आनंदने आपला हा हट्ट सोडला नाही. आशावाद म्हणतात तो हाच). हे सगळेच देव आनंद एके देव आनंद होत गेले. नवकेतन फिल्म हरवत गेले. कलाकार मोठा होताना निर्मिती संस्था मागे राहणे हे योग्य नव्हतेच. नवकेतनपेक्षा देव आनंदचा जुहू येथील आयरीश पार्क येथील प्रशस्त बंगला जास्त चर्चेचा विषय ठरला. तो विक्रीला काढलाय या चर्चेचे वादळ निर्माण झाले. मीदेखील त्या समोर उभे राहून एक व्हिडीओ चित्रीत केला. आज देव आनंद आपल्यात नसला तरी या बंगल्याबाहेरही त्याच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचे एक प्रकारचे अस्तित्व जाणवले.

नवकेतन फिल्मला पंचवीस वर्ष झाल्यानिमित्त विजय आनंदने मनोहर नाथ रंगू दिग्दर्शित जान हाजीर है या चित्रपटाची निर्मिती करताना देवबंधूंचा भाचा शेखर कपूर, प्रेमनाथचा मुलगा प्रेम किशन आणि नताशा या नवीन चेहऱ्यांना संधी दिली. जय पार्टे यांच्या संगीतातील गाणी लोकप्रिय झाली आणि जमुना चित्रपटगृहात मॅटीनी शोला चित्रपटाने तब्बल साठ आठवडे मुक्काम केला. देव आनंदने याचनिमित्त नवकेतनसाठी चेतन आनंदकडे दिग्दर्शन सोपवत टॅक्सी ड्रायव्हरची (१९५४) रिमेक जानेमनची (१९७६) निर्मिती केली. बावीस वर्षांत देव आनंदमध्ये बदल झाला असेल वा नसेलही. नवकेतनमध्ये नक्कीच झाला. हीरा पन्नाला वितरक न मिळाल्याने नवकेतनेच तो मुंबईत वितरित केला. त्याच्या जाहिरातीत नवकेतन वितरण ही जणू नवीन माहिती ठरली. इश्क इश्क इश्कने (१९७४) फ्लॉपचे सगळेच विक्रम मोडले. देव आनंदने विजय आनंदची दिग्दर्शनीय साथ सोडू नये आणि विजय आनंदने अन्य दिग्दर्शकांच्या चित्रपटातून भूमिका करू नये असे नवकेतनप्रेमींना वाटत होते, पण चाहत्यांच्या इच्छेनुसार चित्रपटाचे जग चालत नसते. तर चित्रपटात जे काही दाखवलंय, दिसतंय यावर आपण प्रेम करु शकतो, ते पाहू शकतो. वा नाकारू शकतो. देव आनंद दिग्दर्शित लूटमार, स्वामी दादापासूनच्या चित्रपटांना आपण पाहून नाकारले. ते पाहणे देव आनंद प्रेमापोटी होते. नंतर तेही का पहावे असाच प्रश्न होता. समिक्षक म्हणून पाहत राहिलो आणि साठच्या दशकातील देव आनंद डोळ्यासमोर आणत राहिलो.

आपला मुलगा सुनील आनंदला आनंद और आनंदने रूपेरी पदार्पणाची संधी दिली तरी चित्रपटात देव आनंद जास्त दिसला. (या चित्रपटात स्मिता पाटील होती. नवकेतनच्या चित्रपटात तिने काम केलंय, पण तेही देव आनंदच्या दिग्दर्शनात. तरीही देव आनंदच्या दिग्दर्शनाला कमी लेखावे?) नवकेतनच्या मै तेरे लिए या चित्रपटाच्या मेहबूब स्टुडिओतील मुहूर्ताला तिघे आनंद बंधू एकत्र आल्याचे दिसले. विशेष म्हणजे दिग्दर्शन विजय आनंदकडे आणि सुनील आनंद व मीनाक्षी शेषाद्री प्रेमिक. हा चित्रपट बराच रखडून कसाबसा प्रदर्शित झाला. यानिमित्त केतनव डबिंग थिएटरमधील कार्यालयात विजय आनंदची मुलाखत घेतल्यावर त्याने भेट म्हणून दिलेले गाईडचे बुकलेट माझ्या संग्रहात आहे.







...देव आनंदला थांबणे मंजूर नव्हते हा कौतुकाचा भाग, पण ते नवकेतन फिल्मच्या पथ्यावर पडले का? जाना ना दिल से दूर नावाच्या चित्रपटासाठी विजय आनंदच्या दिग्दर्शनात देव आनंद असा. बऱ्याच वर्षांनी योग आला. उत्साहात मुहूर्त झाला. (यू ट्यूबवर तो आहे) चित्रपट पूर्णही झाला. केतनव डबिंग थिएटरमधील ट्रायल संपल्यानंतर बाहेर पडताच नेहमीप्रमाणेच देव आनंद आम्हा समिक्षकांचे चेहरे वाचत होता. पहिल्यांदाच तो काहीसा निराश वाटला.

नवकेतनची सुरुवात, तेरे मेरे सपनेपर्यंचा चढता प्रवास आणि मग उतार हे सगळेच घडत असतानाच या बॅनरच्या अनेक क्लासिक चित्रपटांचे अस्तित्व, चित्रपट इतिहासातील स्थान, रसिकांचे त्या चित्रपटांचे आकर्षण आणि महत्त्व कायम आहे हे महत्त्वाचे. हे महत्त्व नवकेतनच्या चित्रपटातील विजय आनंदचे दिग्दर्शन कौशल्य, देव आनंदचं दिलखुलास व्यक्तिमत्त्व आणि श्रवणीय गीत संगीत यातून कायम आहे आणि राहिलही.

नवकेतन फिल्मच्या पंचाहत्तरीनिमित्त त्यांच्या चित्रपटांचा महोत्सव आयोजित करायला हवाच. तो जुन्या पिढीतील चित्रपट रसिकांना फ्लॅशबॅकमध्ये जाण्याची चंदेरी/रूपेरी/सोनेरी संधी तर आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला चित्रपटाचा गौरवशाली इतिहास ज्ञात होण्याचा योग.

याच निमित्ताने मुंबई दर्शनात सलमान खान, शाहरुख खान यांच्या बंगल्याप्रमाणेच जुहूच्या आयरीश पार्क येथील देव आनंदचा आनंद बंगलाही दाखवायला हवा. नवकेतन फिल्म ही एक आपली काही वैशिष्ट्य असलेली चित्रपट निर्मिती संस्था.

# मराठी नवकाव्याचे प्रणेते बी.सी. मर्ढेकर

अर्वाचीन मराठी साहित्यातील युगप्रवर्तक कवी तसेच नवकविता व नवटीका यांचा प्रारंभ करणारे श्रेष्ठ साहित्यिक म्हणून बाळ सीताराम मर्ढेकर यांची विशेष ओळख राहिली आहे. त्यांचा जन्म १ डिसेंबर १९०९ सातारा जिल्ह्यातील मर्ढे या गावचा. त्यांचे कुटुंब परंपरेने रामदासी पंथाचे होते. वडील आरंभी शिक्षक होते. पुढे ते शिक्षणक्षेत्रातील एक अधिकारी झाले. मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण खानदेशात धुळे येथे घेतल्यानंतर पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातून ते बीए झाले. १९२९ साली आयसीएस होण्यासाठी ते इंग्लंडला गेले, यात त्यांना यश आले नाही, परंतु इंग्लंडमधील वास्तव्यात तेथील वाङ्मयीन चळवळींचा त्यांनी अभ्यास केला.

टी.एस. एलियट, जेम्स जॉइस, व्हर्जिनिया वूल्फ यांसारख्या श्रेष्ठ साहित्यिकांचा, तसेच क्लाइव्ह बेल, रॉजर फ्राय, हर्बर्ट रीड यांसारख्या समीक्षकांचा मढेकर यांच्या वाङ्मयीन अभिरूचीवर आणि आकलनावर परिणाम झाला. लंडनच्या किंग्ज कॉलेजमध्ये शिकत असताना प्राध्यापक जेम्स सदरलंड यांच्या विचारांचा प्रभावही त्यांच्यावर पडला. १९३२ साली ते भारतात परतले. त्यानंतर टाइम्स ऑफ इंडियाचे सहसंपादक; धारवाड, मुंबई, अहमदाबाद येथील सरकारी महाविद्यालयांतील प्राध्यापक अशा नोकऱ्या त्यांनी केल्या, परंतु त्यांत ते रमले नाहीत. १९३८ साली त्यांनी ऑल इंडिया रेडिओत नोकरी पत्करली आणि अखेरपर्यंत ते त्या नोकरीत राहिले. त्यांनी पहिला विवाह होमाई नल्लासेठ या त्यांच्याच पारशी विद्यार्थिनीशी केला होता, तथापि तो सुखाचा झाला नाही. पुढे अंजना सिंहाल या पंजाबी युवतीशी त्यांनी दुसरा विवाह केला. मर्ढेकर निरिच्छ, अलिप्त व अबोल वृत्तीचे होते.



मर्ढेकरांच्या शिशिरागम या पहिल्या काव्यसंग्रहातील कवितांवर रविकिरण मंडळाची विशेषतः त्यातील माधव जूलियन् यांची छाया दिसून येते, तथापि काही कविता आणि आणखी काही कविता या दोन संग्रहांच्या शीर्षकांप्रमाणेच त्यांतील कविताही वेगळ्या आहेत. अनेक पूर्वसूरींचे संस्कार पचवून त्यातून स्वतःच्या कवितेचे अस्सल रसायन त्यांनी तयार केले आहे. जोष, ठसठशीतपणा, पुरुषी थाट आणि निर्भीडपणा ही या कवितेची काही वैशिष्ट्ये रामदांसाकडून आलेली आहेत. तर शब्दांची मोडतोड, प्रतिमांची जुळवाजुळव, धक्का देणाऱ्या दोन विभिन्न कल्पनांची सांगड घालणे या गोष्टी हॉपकिन्झ, टी.एस. एलियट यांसारख्या कवींशी त्यांचा जवळचा संबंध दर्शवणाऱ्या आहेत तसेच मर्ढेकरांच्या कवितेतून प्रत्ययास येणारा गूढ खिन्नपणा बालकवींची आणि आंग्ल कवी कोलरिज यांची आठवण करू देतो. अभंग आणि ओवी या प्राचीन मराठी रचनाप्रकारांचे मर्ढेकरांनी पुनरुज्जीवन केले. मर्ढेकरांची कविता ही नवकविता किंवा नवकाव्य म्हणून ओळखली जात असली तरी पूर्वपरंपरेशी तिचे निश्चित नाते आहे.

कवितेप्रमाणे कादंबरीच्या क्षेत्रातही मर्ढेकरांनी नवे प्रयोग केले. रात्रीचा दिवस ही जेम्स जॉइस आणि व्हर्जिनिया वूल्फ यांच्या कादंबऱ्यांपासून प्रेरणा घेऊन लिहिलेली कादंबरी. या कादंबरीकारांनी वापरलेले संज्ञाप्रवाहाचे तंत्र मर्ढेकरांनी या कादंबरीत वापरलेले आहे. पश्चिमी ऑपेरांपासून स्फूर्ती घेऊन मर्ढेकरांनी आपल्या संगीतिका लिहिल्या. नटश्रेष्ठ हे त्यांचे एकुलते एक नाटक. समीक्षेच्या क्षेत्रातील मर्ढेकरांची कामगिरी संस्मरणीय ठरली.

राजधानी दिल्ली येथे २० मार्च १९५६ रोजी मर्ढेकर यांचे निधन झाले. मर्ढेकरांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचे महत्त्व त्यांच्या मृत्यूनंतरही जाणवत राहिले. मर्ढेकरपूर्व व मर्ढेकरकालीन साहित्य एकोणिसाव्या शतकातच गुंतून पडलेले आहे. मर्ढेकरांनी त्याला विसाव्या शतकात आणून सोडले. केवळ इंग्रजी साहित्याच्या ओंजळीने पाणी प्यायल्यास मराठी साहित्याची गुणवत्ता आणखी खालावत जाईल ही महत्त्वाची जाण त्यांनी साहित्यिकांत उत्पन्न केली. नवी अभिरुची निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केलाच, परंतु समीक्षाक्षेत्रात सूक्ष्म व भेदक विश्लेषणाची गरज आहे हे पटवून दिले.

**–अनिरुद्ध कुलकर्णी**
**(मराठी विश्वकोष)**

# जागतिक एड्स प्रतिबंधक दिन

**१ डिसेंबर**

दरवर्षी १ डिसेंबर रोजी जागतिक एड्स प्रतिबंधक दिन साजरा केला जातो. एड्सबाबत आपल्या समाजात अनेक गैरसमज आणि भीती आहे. त्यामुळे या आजाराने ग्रस्त लोकांना समाजात आजही लाजिरवाणेपणाचा सामना करावा लागतो. या आजाराबाबत लोकांना १ डिसेंबर या जागतिक एड्स प्रतिबंधक दिनानिमित्ताने त्याच्या प्रतिबंध आणि चाचणीबद्दल जागरूक केले जाते.

ह्युमन इम्युनोडेफिशियन्सी व्हायरसच्या संसर्गामुळे होणारा साथीचा रोग एड्स म्हणून ओळखला जातो. १९८८मध्ये हा दिवस पहिल्यांदा साजरा करण्यात आला. १९९६मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने जागतिक स्तरावर एचआयव्ही/एड्सचा प्रचार-प्रसार करण्याचे काम हाती घेतले आणि १९९७मध्ये जागतिक एड्स मोहिमेंतर्गत संसर्ग, प्रतिबंध व शिक्षण यावर काम करण्यास सुरुवात झाली. त्यानंतर जगभरात हा दिवस साजरा केला जाऊ लागला.

एड्स दिवस जो आज संपूर्ण जग साजरा करत आहे, त्याची संकल्पना थॉमस नेटर आणि जेम्स डब्लू. बन यांनी १९८७मध्ये मांडली होती. थॉमस नेटर आणि जेम्स डब्ल्यू. बन हे दोघेही स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या एड्स ग्लोबल प्रोग्रामसाठी सार्वजनिक माहिती अधिकारी होते. त्यांनी ही कल्पना डॉ. जोनाथन मुन (एड्स ग्लोबल प्रोग्रामचे संचालक) यांच्याशी शेअर केली, ज्यांनी या कल्पनेला मान्यता दिली आणि १९८८पासून १ डिसेंबर हा जागतिक एड्स प्रतिबंधक दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला. सुरुवातीला हा दिवस केवळ लहान मुले व तरुणांशी संबंधित होता, पण नंतर एचआयव्ही संसर्ग कोणत्याही वयोगटातील लोकांना होऊ शकतो असे आढळून आल्यानंतर १९९६मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने जागतिक स्तरावर एड्स प्रतिबंधक प्रचार आणि प्रसार करण्याचे काम हाती घेतले. १९९७पासून जागतिक एड्स प्रतिबंधक मोहीम सुरु झाली.

एड्स ही आज जगातील सर्वात मोठी आरोग्य समस्या आहे. कारण यावर अद्याप कोणतीही लस उपलब्ध नाही. जागतिक एड्स प्रतिबंधक दिन साजरा करण्यामागचा उद्देश एड्समुळे पसरलेल्या संसर्गाबद्दल प्रबोधन करणे हा आहे.

(साभार : इंटरनेट)

# जबरी चोरी करणारा जेरबंद

- बोर्ली पंचतनमधील घरफोडींची उकल
- दिघी सागरी पोलीस ठाण्याची कारवाई

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन गावामध्ये काही महिन्यांपासून दिवसा व रात्री बंद दरवाजे तोडून घरफोडी करून त्यातील रोख रक्कम व दागिने चोरी होण्याचे प्रकार सतत घडत होते पोलीसदेखील यामुळे हैराण झाले होते. अखेरीस चोरी करून जनतेत तो मी नव्हेच म्हणून मिसळणाऱ्या अजिंक्य उद्देश सायगावकर (वय २७) या तरुण चोराला पोलिसांनी जेरबंद केले आहे.

पोलिसी खाक्या दाखविल्यावर झालेल्या चोऱ्या मीच केल्याचे मान्य केल्या असल्याचे समजते. तर आरोपोस ३० नोव्हेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, दिघी सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बोर्ली पंचतन येथे मागील पाच महिन्यांपासून बंद घर किंवा घरातील व्यक्ती कामानिमित्त बाहेर असताना रात्री किंवा एकाबाजूला असणाऱ्या घरात दिवसा दरवाजा तोडून, खिडक्यांचे गज तोडून घरात प्रवेश कपाट तोडून त्यामध्ये असणारे सोन्याचे मौल्यवान दागिने तसेच रोख रक्कम चोरी होण्याच्या घटनेमध्ये दिवसेंदिवस वाढ होत होती. पोलीसदेखील चोराचा शोध घेत होते, परंतु काही केल्या उकल होत नव्हती. अखेरीस पोलिसांना त्यांच्या गुप्तहेरांकडून लागलेल्या सुगाव्यानुसार बोर्ली पंचतन येथील अजिंक्य उद्देश सायगावकर याला ताब्यात घेतली कोणतेही काम न करता ऐशो आराम व मौजमजा लुटणाऱ्या तसेच घरामध्ये आपल्या कुटुंबातील सदस्यांना सोन्याचे दागिने करून देणे, घर बंधणीसाठी मोठी रक्कम अनामत रक्कम देणे अशा गोष्टी पोलिसांच्या कानावर आल्या त्यानंतर त्यास पोलिसी खाक्या दाखवल्यावर त्यांनी बोर्ली पंचतन मध्ये झालेल्या चोऱ्या आपणच केल्याची कबुली दिली. यामध्ये काही चोरलेले मोबाईलदेखील त्याच्या घरून हस्तगत केले आहेत.

फिर्यादी मंदार नरवणकर यांच्या घरातील ३ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या घरफोडी मध्ये पाच लाख रुपये रोख रक्कम व सुमारे चार लाखांचे दागिने चोरीस गेले होते व ही चोरी आपणच केल्याचे आरोपीने मान्य केले असल्याचे समजते. अनेक चोऱ्यांची उकल होण्यास मदतच होईल, असे बोलले जाते.

पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा रजि. नंबर ९२/२०२४ भारतीय न्याय संहिता अधि. २०२३ चे कलम ३३१(४), ३०५ अनव्ये याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला असून अद्याप कोणत्याही प्रकारे सोने पोलिसांनी ताब्यात घेतलेले नाही. आतापर्यंत बोर्ली पंचतन मध्ये अंदाजे किमान १० चोऱ्या झाल्या यातून लाखोंचा माल चोरीस गेला होता. यामध्ये दागिने व रोख रक्कमेचा समावेश आहे.

आमचा तपास सुरू असून या चोरीमध्ये सामील असणाऱ्या सर्वांना लवकरच ताब्यात घेऊ असे दिघी सागरी पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक हनुमंत शिंदे यांनी सांगितले तर यापुढील तपास सपोनि हनुमंत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक ए.एस. शेख, सपोह एस.ए.घरत करीत आहेत.

**● अन्य घटनाही उघडकीस आणण्याची मागणी**

*बोर्ली पंचतन येथील चोरी करणाऱ्या चोरास अटक केल्यानंतर बोर्ली पंचतनमध्ये याआधी ज्यांच्याकडे चोऱ्या झालेल्या होत्या असे ग्रामस्थ पोलीस ठाण्यात दाखल झाले आहेत. त्यांच्या चोरीबाबतदेखील तपास करण्याची विनंती ग्रामस्थ पोलिसांना करीत आहेत.*

# मुरूडजवळील एकदरा रस्ता डागडुजी करण्याची मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड पर्यटन क्षेत्र असुन याठिकाणी रोज शेकडो पर्यटक ये-जा करित असतात. शहराच्या सुरुवातीलाच परेश हॉटेलपासुन, तहसीलदार कार्यालय, समुद्रकिनारा, मच्छी मार्केट व एकदरा पुलापर्यंत रस्तावर खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे या रस्त्याची लवकरात लवकर डागडुजी करण्यात यावी, अशी मागणी नागरिक करीत आहेत.



या रस्तावरून पर्यटकांना ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी ये-जा करावे लागत असल्याने या रस्त्याला महत्व प्राप्त झाले राज्य सरकारने या रस्त्याकरिता निधी प्राप्त करून दिला. निधी प्राप्त असुनसुद्धा रस्ता बनला गेला नाही. जर ठेकेदारांकडुन वेळेत काम सुरू करत नसेल तर ठेका रद्द करून दुसऱ्या पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक आहे. रस्त्याच्या कामाला सुरूवात झाली नसल्याने या रस्त्यावरचे खड्डे खड्ड्यात रस्ता हेच कळत नाही या खड्ड्यातुन पर्यटकांना व स्थानिक नागरिकांना पुन्हा खडतर प्रवास करावा लागत आहे. या रस्त्याकडे लक्ष द्यावे आणि खड्ड्यातला प्रवास सुखकर करावा, अशी मागणी होत आहे.

या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाचे इंजिनिअर श्रद्धा बोऱ्हाडे यांच्याशी विचारणा केली असता ते म्हणाले की, मी आताच याठिकाणी आले आहे. परेश हॉटेल ते एकदरा पुलापर्यंतचा रस्ताचा ठेका सुप्रभात एजन्सीला ७ जुलै २०२३ या दिवशी देण्यात आला आहे, परंतु या कामाला सुरुवात झाली नाही आहे. या संदर्भात आमच्या वरिष्ठांशी बोलुन ठेकेदाराला आम्ही पत्रव्यवहार करणार आहेत, अशी प्रतिक्रिया सार्वजनिक बांधकाम विभागाचे इंजिनिअर श्रद्धा बोऱ्हाडे यांनी दिली.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता रमेश गोरे यांच्याशी विचारणा केली असता ते म्हणाले की, सुप्रभात एजन्सी यांना पत्रव्यवहार करून त्यांच्या कडुन लवकरच या रस्त्याला कामाला सुरुवात घेऊ अशि प्रतिक्रिया सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता रमेश गोरे यांनी दिली.

# चौल टेकाळकर आळी अंतर्गत रस्ता काँक्रिटीकरणाचा शुभारंभ

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल ग्रामपंचायत अंतर्गत टेकाळकर आळी अंतर्गत रस्ता काँक्रिटीकरणाचा शुभारंभ कार्यक्रम नुकताच झाला.

चौल टेकाळकर आळी येथे खासदार सुनील तटकरे यांचे फंडनिधीतून नुतन काँक्रिटीकरण रस्ता करण्यात येत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रवीण राउत यांचे हस्ते पुजाअर्चा तसेच श्रीफळ वाढवून रस्ता काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ करण्यात आला.



या वेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष हेमंत दांडेकर, चंपावती पतसंस्थेचे चेअरमन विश्वास जोशी, संकेत जोशी,तसेच जयवंत नागवेकर, मोहन पराड, महेश कवळे, साहील कंटक यांच्या प्रमुख उपस्थितीसह टेकाळकर आळी ग्रामस्थ जगदीश म्हात्रे, रोहन कनगुटकर, नितिन टेकाळकर, सचिन टेकाळकर, शैलेश टेकाळकर, नरेंद्र टेकाळकर, विवेक टेकाळकर, शशिकांत टेकाळकर, महेंद्र म्हात्रे, अरूण टेकाळकर, विजय टेकाळकर, नंदकुमार गजानन टेकाळकर, नंदकुमार रघुनाथ टेकाळकर, वंसत टेकाळकर, व सुजल टेकाळकर आदींची उपस्थिती होती.

# विठ्ठल मंदिरात भाविकांना फराळाचे वाटप

**पाली : प्रतिनिधी**

रायगडच्या सुधागड तालुक्यातील घपकी येथील विठ्ठलवाडी गावातील पुरातन व ऐतिहासिक विठ्ठल रखुमाई देवस्थान मंदिरात भाविकांना फराळ वाटप करण्यात आले.



तीन नद्यांच्या संगमावर हे पुरातन मंदिर असून धार्मिक दृष्ट्या अधिक प्रसिद्ध आहे. मंदिर परिसरातील आंबोले, रासळवाडी, रासळ, वावे, चिवे, मजरे जांभूळ पाडा, उसाळे, खुरावले, भेरव, काणीवली, ठाणाळे, उद्धर, पिलोसरी, वाफेघर, घपकी (विठ्ठलवाडी), आवंढे अशा १६ गावांचा समावेश आहे. या १६ गावातील नागरिक भाविक येथील प्रत्येक धार्मिक उत्सव व कार्यक्रमात हिरीरीने सहभागी होतात. त्यामुळे कार्यक्रमाचा उत्साह द्विगुणित होताना दिसतो.

भाविकांसाठी सामाजिक कार्यकर्ते अशोकभाऊ रायकर, सामाजिक कार्यकर्ते कैलास दळवी, ह.भ.प सटूराम दळवी महाराज, ह.भ.प अंकुश जयराम सावंत महाराज यांच्या संकल्पनेतून व घपकी विठ्ठल रखुमाई देवस्थान ट्रस्ट यांचे सहकार्याने कार्तिक एकादशी पासून मोफत फराळ वाटप करण्याचा स्तुत्य उपक्रम सुरू करण्यात आला.

याचा भाविकांनी लाभ घेतला असून हा उपक्रम प्रत्येक एकादशीला सुरू ठेवण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. यावेळी घपकी विठ्ठल रखुमाई देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष गंगाधर नाना जगताप, उपाध्यक्ष नरेश लहाने, वामन लक्ष्मण खाडे, सुरेश श्रीपत खाडे, मारुती शंकर खाडे, श्रीधर खाडे, नामदेव शिंदे, मधुकर यादव, हभप यशवंत महाराज रायकर आदींसह गावकरी, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीवर्धनमध्ये मसाला पिकांचा घमघमाट

## बागायतदारांकडून आर्थिक उत्पन्न देणाऱ्या आंतरपिकांची लागवड

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यात निसर्ग व ताऊक्ते या दोन चक्रिवादळांत नारळ व रोठा सुपारी झाडांचे अतोनात नुकसान झाले. काही कालावधीनंतर नुकसानग्रस्त बागायतदारांनी आपापल्या वाड्यांमधून रोठा सुपारी व नारळ रोपांची लागवड केली. लागवडी नंतर उत्पादन मिळण्यास किमान चार ते पाच वर्षे इतका कालावधी सुपारी, नारळ या झाडांना लागतो. या कारणास्तव आता श्रीवर्धन येथील बागायतदार कमी कालावधीत वर्षभर उत्पादन व उत्पन्न देणाऱ्या मसाला पीक या आंतरपीकाला प्राधान्य देऊ लागलेत.

श्रीवर्धन तालुक्यात नैसर्गिक आपत्तीत बागायती फळझाडे समजल्या जाणाऱ्या नारळ व रोठा सुपारीच्या झाडांचे ऐंशी टक्के नुकसान झाले होते. वाड्यांमधुन उन्मळून पडलेल्या माड व पोफळींची जागा स्वच्छ करीत बागायतदारांनी नव्याने माड व सुपारी रोपांची लागवड केली.



### आंतरपिकांचा हंगाम

*(१) हळद-कंद लागवडी नंतर नऊ ते दहा महिन्यानी उत्पादन. हळदीची पाने पिवळी पडून सुकायला लागल्यावर जमीनीतील कंदाची काढणी.*

*(२) लवंग-लागवडी नंतर तीन वर्षांनी झाडास कळी धारणा. कळीच्या घुमटाची पुर्ण वाढ झाल्यावर साधारण हंगामास सुरुवात एप्रिल ते मे महिन्या दरम्यान.*

*(३) दालचिनी-लागवडी नंतर तीन वर्षांनी पहिल्या सालीची काढणी. जुन ते जुलै महिन्यात हंगामास सुरुवात.*

*(४) काळीमिरी-लागवडी नंतर अडीच वर्षांनी फळे धरू लागतात. मार्च ते एप्रिल दरम्यान काढणीस योग्य.*

*(५) मिरची-लागवडी नंतर आठ ते दहा महिन्यात उत्पादन. हंगाम बारा महिने.*

*(६) जायफळ-लागवड केल्यापासून चार वर्षांनी उत्पादन. जायफळ व जायपत्री हंगामास जुन ते जुलै महिना.*

या वेळी बागायतदारांनी माड,पोफळीच्या मधील मोकळ्या जागेत मिश्रपीकांची मोठ्या प्रमाणावर लागवड केली. श्रीवर्धन तालुक्यात आज हळद, लवंग, दालचिनी, काळीमिरी, मिरची, जायफळ या आंतरपीकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत आहे.

नारळ व सुपारी झाडांना बारमाही पाण्याच्या जमीन मानवतात तशाच मसाला पीकाला ही बारमाही जमीन योग्य असल्याने येथील बागायतदार वार्षिक उत्पादन व उत्पन्न देणाऱ्या मसाला पीकाकडे लक्ष केंद्रित करू लागलेत.

हळद, लवंग, दालचिनी, काळीमिरी, मिरची, जायफळ या मसाला पिकांचे उत्पादन चांगल्या प्रकारे होत आहे. आपल्याच वाडीत मसाला पीक येत असल्याने बागायतदार तालुक्यातील बाजारपेठेत प्रक्रिया करून मसाले विक्रिस पाठवत आहेत तर महिलावर्गासाठी घरगुती मसाला तयार करून विक्री करीता ठेवणे हे एक व्यवसायाचे साधन उपलब्ध झाले आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील नारळ व पोफळीच्या वाड्यांमध्ये हळदीचे क्षेत्रफळ हेक्टरी ३०.११. लवंग क्षेत्रफळ हेक्टरी ११.००. दालचिनी क्षेत्रफळ हेक्टरी २८.३७. काळिमिरी क्षेत्रफळ हेक्टरी २४.५५. मिरची क्षेत्रफळ हेक्टरी ३६.८९ व जायफळाचे क्षेत्रफळ हेक्टरी २९.८७ इतके आहे. माड व पोफळींना खत पाणी देत असताना आंतरपीकांना जास्त मात्रेत खत पाणी द्यावे लागते. याचा फायदा असा होतो की माड, सुपारीच्या वाढीवर आणि उत्पादनात चाळीस ते साठ टक्क्यांनी वाढ होते.

श्रीवर्धन तालुक्यातील अनेक बागायतदार वाडीतील बागायती फळझाडांना सोडण्यात येत असलेल्या पाण्याच्या अपव्यय न होऊन देता दोन झाडांमध्ये मोकळ्या जागेत आंतरपिकांची यामध्ये मसाला पिकांची लागवड करीत उत्पादन घेत आहेत.

# रोह्यात जागतिक अपंग दिनानिमित्त रॅली

**रोहा : प्रतिनिधी**

जागतिक अपंग दिनानिमित्त शुक्रवारी (दि.२९) ग्रेगोरियन स्पेशल स्कूलतर्फे रॅलीचे आयोजन करण्यात आले. हे स्कूल ग्रेगोरियन पब्लिक स्कूलशी संलग्न असून, ग्रेगोरियन कम्युनिटी, किल्ला, रोहा यांच्याद्वारे व्यवस्थापित आहे.



कार्यक्रमाची सुरुवात सागर डेअरीजवळ विशेष मुलांनी सादर केलेल्या सुंदर सामूहिक नृत्याने झाली. त्यानंतर सागर डेअरीपासून एसटी स्टँड, रोहापर्यंत रॅली सुरू झाली. रोहा पोलीस विभागाने रॅलीसाठी सहा पोलीस अधिकाऱ्यांची सुरक्षा व्यवस्था पुरवली.

रॅलीनंतर विशेष मुलांनी आणखी एक सामूहिक नृत्य सादर केले आणि त्यानंतर हिंदी प्रार्थना गीत गायले. मास्टर श्रवण संजय मोहिते यांनी बॉलिवूड संवाद सादर केला. त्यानंतर फील्ड प्रशिक्षणार्थी कुमारी शेरोन एल्सा साजी यांच्या नेतृत्वाखाली मराठी गटगीत सादर करण्यात आले, ज्यामध्ये कर्मचारी व प्रशिक्षणार्थी सहभागी झाले.

यानंतर कविता राजेश साळुंके (मुख्याध्यापिका), मिस्टर आशीष जेम्स (प्रशासक), आणि नीरमला निकेतन कॉलेज ऑफ सोशल वर्क, मुंबईच्या प्रथम वर्षाच्या एमएसडब्ल्यू विद्यार्थ्यांनी (मिस्टर रोहित गणेश पालवे, दिशा अनिल गायकवाड, क्शेरोन एल्सा साजी) तसेच डेथ्री फाउंडेशनच्या कुमारी सिंथिया तिर्की (सामाजिक कार्यकर्त्या) यांच्या पुढाकाराने एक रंगीत पथनाट्य सादर करण्यात आले.

ग्रेगोरियन स्पेशल स्कूलचे सुमारे आठ विद्यार्थी आणि ग्रेगोरियन पब्लिक स्कूलचे २० स्काउट व गाईड विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी करून रॅलीला पाठिंबा दिला. स्वयंसेवक दर्शन राजेश साळुंके, रूचिता राजेश साळुंके व विशेष मुलांचे पालकही यात सहभागी झाले. ही रॅली सुमारे ८५० मीटर अंतरासाठी होती.

फादर टीयू थॉमस (ग्रेगोरियन कम्युनिटीचे ट्रस्ट सदस्य), फादर फिलिप कुरुविला (कार्यक्रम समन्वयक), सौ. बिबी कुरुविला (समुपदेशक), मिस्टर सुधीर जंगम (क्रीडा शिक्षक), आणि फुलकुमारी तिर्की (सहायक कर्मचारी) यांनीही या रॅलीत सहभाग घेतला.

मुख्याध्यपिका कविता राजेश साळुंके यांनी विशेष मुलांविषयी व जागतिक अपंग दिनाबद्दल भाषण दिले. मिस्टर रोहित गणेश पालवे यांनी उपस्थित जनतेचे आभार मानले. उपस्थितांपैकी काहींनी या रॅलीबद्दल आपली मते मांडली आणि सांगितले की, या कार्यक्रमामुळे विशेष मुलांविषयी त्यांना महत्त्वपूर्ण माहिती मिळाली.

# ज्योती साळवी सेवानिवृत्त

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिकेत वरिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत असलेल्या ज्योती श्याम साळवी यांनी ३५ वर्षे प्रामाणिकपणे खोपोली नगरपालिकेत सेवा बजावत या सेवेतून ३० नोव्हेंबर रोजी सेवानिवृत्त झाले आहेत.

ज्योती साळवी यांना सेवानिवृत्त देताना खोपोली नगरपालिकेचे अधिकारी, कर्मचाऱ्यासह खोपोलीकरांचे डोळे पाणावल्याचे पहावयास मिळाले असून सेवानिवृत्त सोहळा खोपोली नगरपालिकेच्या सभागृहात झाला.

या वेळी खोपोली नगरपालिकेचे उपमुख्याधिकारी रणजीत पवार, गौतम भगळे, भोईर, नगर रचनाकार साहिल गाढवे, माजी पंचायत समितीचे उपसभापती श्याम साळवी, माजी नगरसेवक मोहन अवसरमल, माजी नगरसेविका मामी शेलार, केवीना गायकवाड, सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा मोरे, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी ग्रुपचे प्रमुख गुरुनाथ साठीलकर आदी उपस्थित होते.

ज्योती साळवी ह्या नगरपालिकेत वरिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत रुजू होण्याआधी अपंगत्वाला सामोरे जावे लागले होते तर त्यांनी मनात अपंगत्वाची कोणतीही भय न बाळगता एक हात असताना ३५ वर्षे सेवा बजावली.




## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे हरिग्राम, तहसील- पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री. जयंत पोशा पाटील, श्री. चंद्रप्रभा प्रकाश म्हात्रे, वासुदेव पोशा पाटील, गुरूदेव पोशा पाटील, कमल प्रकाश पाटील यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालीलप्रमाणे

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे हरिग्राम, तहसील पनवेल, जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | | | आकार रू.पै |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक | क्षेत्र पोटखराबा | एकूण क्षेत्र | |
| | | हे. आर. प्रती | हे. आर. प्रती | हे.आर.प्रती | |
| ३४/७ | १ | ०-६९-४० | ०-०६-६० | ०-७६-०० | १३.०० |

वरील शेतजमीन /मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत यवून सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २९/११/२०२४

**कार्यालयीन पत्ता**
बी. १०२, पहिला मजला, श्री दत्तराज सोसायटी, जुने तहसिलदार ऑफिस समोर ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६

**सही /-**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी.ए.एल.एल.बी.**
**(खरेदीदाराचे वकिल)**

# नवी मुंबईत ५२७ इमारती धोकादायक घोषित

## स्ट्रक्चरल ऑडिट करून घेण्याचे रहिवाशांना आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील धोकादायक इमारतींचे सन २०२४-२५ या वर्षासाठी सर्वेक्षण करण्यात आले आहे. सर्वेक्षणानंतर ५२७ इमारती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६४ पोटकलम (१)(२)(३)(४) अन्वये धोकादायक इमारती म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत.



महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६५(अ) नुसार ज्या इमारतींचा वापर सुरू होउन ३० वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला आहे, अशा इमारतींचे नवी मुंबई महानगरपालिकेकडे नोंदणी केलेल्या बांधकाम अभियंत्याकडून किंवा संरचना अभियंत्याकडून संरचना परीक्षण करून घेणे अनिवार्य आहे.

३० वर्षापेक्षा जास्त काळ इमारतीचा वापर किंवा इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र (पूर्ण अथवा अंशत:) क्षेत्रफळ वापराखाली आणले गेले अशा दिवसापासून मोजावयाचा आहे. नेमलेल्या संरचना अभियंत्याने शिफारशी केलेली दुरूस्तीची कामे पूर्ण झाल्याचे व ते बांधकाम सुस्थितीत असल्याचे प्रमाणपत्र नवी मुंबई महानगरपालिकेकडे सादर करावे.

याप्रकारे संरचना परीक्षण करण्याचे उत्तरदायित्व जी संस्था अथवा मालक अथवा भोगवटादार पार पाडण्यास टाळाटाळ करतील त्यांना २५,००० रुपये अथवा सदर मिळकतीच्या वार्षिक मालमत्ता कराची रक्कम यापैकी जी जास्त असेल तितक्या रक्कमेचा दंड ठोठवावयाची तरतूद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३९८ (अ) खाली अंतर्भूत करण्यात आली आहे. नवी मुंबई महानगरपालिकेने संरचनात्मक परीक्षक (स्ट्रक्चरल इंजिनियर) यांची यादी नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in संकेतस्थळावर (website) उपलब्ध करून दिलेली आहे.

३० वर्षांपेक्षा जास्त काळ झालेल्या इमारतीचे संरचनात्मक परीक्षण ३१ मार्च २०२५ पूर्वी पूर्ण करून याबाबतचा अहवाल संबधित विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी किंवा सहाय्यक संचालक नगररचना, नवी मुंबई महानगरपालिका यांचेकडे सादर करावयाचा आहे.

धोकादायक झालेल्या इमारतींचा अथवा घरांचा वापर केल्यामुळे जिवित व वित्त हानी होऊ शकते म्हणून नागरिकांकडून धोकादायक इमारतींचा अथवा घराचा रहिवास अथवा वापर तत्काळ थांबविण्यात यावा असे आवाहन नवी मुंबई महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे. अन्यथा दुर्दैवी अपघात घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधितांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

# कंटेनरच्या धडकेत डिलिव्हरी बॉयचा मृत्यू

### उरण फाटा मार्गावरील घटना

**नवी मुंबई : बातमीदार**

भरधाव कंटेनरच्या धडकेत डिलिव्हरी बॉयचा मृत्यू झाला. ही घटना उरण फाटा मार्गावर बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणी अज्ञात कंटेनर चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

डिलिव्हरी बॉयचे काम करणारे गन्नवारापू शिवप्रसाद (४४) हे यूलू या इलेक्ट्रिक मोटारसायकलवरून जात होते. त्यावेळी पाठीमागून आलेल्या कंटेनरने त्यांना धडक दिली. हे लक्षात येताच चालकाने तेथून पळ काढण्यासाठी कंटेनर पळविल्याने शिवप्रसाद चाकाखाली चिरडून गंभीर जखमी झाले. त्यावेळी सदर मार्गाने जाणाऱ्या साहील सय्यद व अयास कुरेशी यांनी त्यांना तातडीने रुग्णालयात नेले, परंतु डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. बहुतांश डिलिव्हरी बॉयकडून इलूचा




वापर होत आहे. या घटनेने युलू बाईक वापरणाऱ्यांमध्ये चिंता पसरली आहे.

या बाईकवर फिरणाऱ्या कोणाकडेही हेल्मेट पाहायला मिळत नाही, परंतु इतर दुचाकीप्रमाणेच मुख्य रस्त्यांवर वेडयावाकडया धावणाऱ्या यूलूवर कारवाईचा पर्यायच नसल्याने वाहतूक पोलिसांकडूनदेखील त्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे अशा प्रकारच्या घटना भविष्यातही घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# क्रीडांगणात डागडुजीची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेच्या माध्यमातून शहरातील खेळाच्या मैदानांची देखभाल दुरुस्ती नेहमीच केली जाते, परंतु काही ठिकाणी या संदर्भात लक्ष देणे गरजेचे आहे. वाशी सेक्टर १ नेताजी सुभाष चंद्र बोस क्रिडांगणाची दुरवस्था झाल्याने खेळाडूंकडून संताप व्यक्त केला जात आहे.




सिडकोने शहर वसवताना रहिवासी वस्ती लगत उद्याने आणि मैदाने, मोकळ्या जागा राखीव केल्या. ही ठिकाण म्हणजे शहराचा श्वास असल्याने नवी मुंबईतील ठिकठिकाणी प्रत्येक नोडमध्ये आरक्षित करून नागरिकांच्या सेवेत उपलब्ध करून दिल्या आहेत. अशाच प्रकारे वाशी सेक्टर १ आणि २ या परिसरातील रहिवाशांकरीता वाशी सेक्टर १ येथे नेताजी सुभाष चंद्र बोस खेळाचे मैदान आहे. या मैदानाच्या संरक्षण भिंतीची दुरवस्था झाली आहे. येथील ठिकाणी संरक्षण भिंत सुटली आहे तसेच काही ठिकाणी केवळ दोन ते अडीच फुटाची संरक्षक ग्रिल असल्याने त्यावरून उड्या मारून भटकी कुत्री, जनावरे या मैदानामध्ये फिरताना दिसतात. त्याचबरोबर मैदानाची नियमितपणे साफसफाई न केल्याने ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग आढळून येतात. हे मैदान जणू काही भंगार सामान ठेवण्याची जागाच बनले आहे.

सध्या विद्युत विभागाचे विजेचे जुने खांब या ठिकाणी गेल्या अनेक महिन्यांपासून पडलेले आहेत. मैदानातील पावसाळी गटर तुटले आहे. तसेच या गटारांमध्ये पुष्कळ प्रमाणात गाळ साचला आहे. मैदानामध्ये बसवण्यात आलेली बाकी तुटलेल्या स्थितीमध्ये आहेत. तसेच गवतही नियमितपणे काढले जात नाही. त्यामुळे क्रीडा प्रेमींमध्ये महापालिकेच्या या कारभाराविषयी संताप व्यक्त केला जात आहे.

या ठिकाणी विविध खेळ खेळण्याकरिता खेळण्याकरिता जागा आखून देण्यात यावी, अशी मागणी खेळाडूंकडून केली जात आहे.

# मोहोपाड्यात अष्टविनायक हॉस्पिटलचे उद्घाटन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा परिसरात सुसज्ज हॉस्पिटल नसल्याने अपघातात जखमी झालेल्यांना मुंबई येथे उपचारार्थ न्यावे लागते. यात अधिक वेळ जात असल्याने अनेकांना आपले जीव गमवावे लागले आहे.

रसायनीकरांसाठी सुसज्ज असे पनवेल खांदा कॉलनी येथील अष्टविनायक हॉस्पिटल मोहोपाड्यातच झाले असून या हॉस्पिटलचे उद्घाटन वासांबे-मोहोपाडा ग्रामपंचायतीच्या सरपंच उमा संदीप मुंढे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी हॉस्पिटलचे डॉ. अक्षदीप अग्रवाल, डॉ. अन्सारी, रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर व प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

या सुसज्ज हॉस्पिटलमध्ये डायलेसीस, आयसीयू, व्हेंटीलेटर, स्पाईन, न्यूरॉलॉजी यांच्यासह विविध सुविधा तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत करण्यात येणार असून रूग्णांसाठी सर्व प्रकारचे कॅशलेश इन्शूरन्स या ठिकाणी उपलब्ध असणार आहेत. रसायनीकरांसाठी माफक दरात वैद्यकीय सेवा उपलब्ध झाल्याने डॉ. अक्षदीप अग्रवाल यांचे आभार मानले जात आहेत.



# नवी मुंबईत ६२ किलो प्लास्टिक जप्त

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार दिवाळीच्या आधीपासूनच प्लास्टिक प्रतिबंधात्मक कारवाईला सुरुवात करण्यात आली असून नोव्हेंबर महिन्यात २५ दुकाने अथवा आस्थापना यांच्यावर कारवाई करीत एक लाख ६० हजार इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच ६२ किलो १०० ग्रॅम एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आलेले आहे.

‘प्लास्टिकमुक्त नवी मुंबई’ ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी नागरिकांपर्यंत पोहचून एकल वापर प्लास्टिकचा वापर टाळावा यासाठी व्यापक जनजागृती करण्यात येत असून दुसऱ्या बाजुला प्लास्टिक प्रतिबंधात्मक कारवाई करून प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात येत आहे.



यामध्ये बेलापूर विभागात १८ दुकाने अथवा आस्थापना यांच्यावर कारवाई करत एक लाख २५ हजार दंडात्मक रक्कम वसूल केली आहे, तसेच ४२ किलो एकल वापर प्लास्टिक जप्त केले आहे. अशाचप्रकारे नेरूळमध्ये एका दुकानावर कारवाई करत पाच हजार दंडात्मक रक्कम वसूली व १.५ किलो एकल वापर प्लास्टिक जप्त केले आहे. वाशी विभागातही एका दुकानदाराकडून एक किलो एकल वापर प्लास्टिक जप्ती तसेच पाच हजार दंडात्मक रक्कम वसूली करण्यात आली आहे. कोपरखैरणे विभागातही एक दुकानदाराकडून ५०० ग्रॅम प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्ती तसेच पाच हजार दंड वसूली करण्यात आली आहे. याशिवाय परिमंडळ १ मधील भरारी पथकाने १५ किलो प्लास्टिक जप्ती व पाच हजार दंड वसूली आणि परिमंडळ २ मधील भरारी पथकाने तीन दुकानदारांवर कारवाई करून दोन किलो १०० ग्रॅम प्लास्टिक साठा जप्ती तसेच १५ हजार दंडात्मक रक्कम वसूल केली आहे. अशाप्रकारे नोव्हेंबर महिन्यात नमुंमपा क्षेत्रात एक लाख ६० हजार दंडात्मक रक्कम वसूली व ६२ किलो १०० ग्रॅम प्रतिबंधात्मक प्लास्टिक साहित्य जप्त करण्यात आले आहे.

# कृतज्ञता पुरस्काराबाबत आवाहन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण सेंटर नवी मुंबई केंद्रातर्फे कृतज्ञता पुरस्कार जानेवारी २०२५ मध्ये समारंभपूर्वक प्रदान करण्याचे संस्थेने ठरविले आहे. त्यासाठी मान्यवर संस्था वा व्यक्ती यांनी प्रवेशिका पाठवाव्यात, असे आवाहन यशवंतराव चव्हाण सेंटर नवी मुंबई केंद्राचे अध्यक्ष प्रमोद कर्नाड यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनी केल्याचे सचिव डॉक्टर अशोक पाटील यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे.

पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या संस्था / व्यक्ती यांनी आपली इत्यंभूत माहिती व अर्ज अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण सेंटर नवी मुंबई यांचे नावे आपला पत्ता, दूरध्वनी क्रमांक यासह सर्व माहिती असलेला व आपल्या कार्याविषयी तपशील देणारा अर्ज अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण सेंटर नवी मुंबई यांच्या नावे ycp.navimumbai123@gmail.com अथवा pramodkarnad@gmail.com या ई- मेल द्वारे १० डिसेंबर २०२४ पर्यंत पाठविण्याची व्यवस्था करावी. यापूर्वी ज्यांना हा पुरस्कार प्राप्त झालेला आहे त्यांनी पुन:श्च अर्ज करू नये. अधिक संपर्कासाठी प्रमोद कर्नाड (९८६७६७३३९९) यांच्याशी संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.





**पनवेल : विधानसभा निवडणुकीत विजयाचा चौकार मारणारे आमदार प्रशांत ठाकूर व त्यांचे मार्गदर्शक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरू आहे. अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले.**

# आरटीओ कार्यालयात रक्तदान शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबईवर झालेल्या २६/११ हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली वाहण्यासाठी नवी मुंबई आरटीओ कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ६०हुन अधिक जणांनी रक्तदान केले.

शहरात अनेकदा रक्ताचा तुटवडा भासतो. त्यामुळे रूग्णालयात गंभीर जखमी असलेल्या किंवा शस्त्रक्रियेसाठी असलेल्या रुग्णांना रक्त पुरवठा करताना रक्तपेढ्यांना नाकी नऊ येतात. तर रुग्णाचे नातेवाईक अनेकदा वणवण फिरताना दिसतात. याचा विचार करत हल्ल्यात शहीद झालेले नागरिक व जवानांना मानवंदना व अद्धांजली अर्पण करण्यासाठी नवी मुंबईतील वाहनचालक, मालक, परिवहन प्रतिनिधी, सामाजिक संस्थांनी रक्तदान शिबीर भरवले होते. या शिबिरात ६०हुन अधिक रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून आपली जबाबदारी पार पाडली. या शिबिरास प्रमुख अतिथी म्हणून सहाय्यक परिकान अधिकारी गजानन गावंडे यांनी नागरिकांना मार्गदर्शन केले व रक्तदानाचे आवाहन करत रस्ता सुरक्षा संदर्भात प्रेरित केले.

या रक्तदान शिबिरास संस्थेचे अध्यक्ष राजेश भोईर, उपाध्यक्ष किरण ढवळे, उपाध्यक्ष अमरदिप सिंग, सचिव धनंजय पाटील, प्रमुख सल्लागार इंद्रजित सिंग, सदस्य तुषार रावराणे, प्रमोद तनपुरे, बलविंदर सिंग, किरण मानगावकर, प्रेम रूपानी, तरुण मस्तान, बलदेव सिंग, शंकर शास्त्री नियमित (रक्तदाते) सर्व प्रतिनिधींनी मोलाचे सहकार्य केले व जनजागृती करत रक्तदान शिबिर यशस्वीरीत्या पार पाडले.



### ‘रक्तदानामुळे मनुष्यसेवा’

*या कार्यक्रमात तब्बल ४५ वेळा रक्तदान करणारे निलेश कचरे यांनी रक्तदानाचे फायदे समजावत नागरिकांना रक्तदानासाठी प्रेरित केले. मनुष्याने रक्तदान करणे आवश्यक असून त्यामुळे अनेक जीव वाचत असतात. नकळत आपल्याकडून मनुष्यसेवा घडत असते, असे निलेश कचरे म्हणाले. या शिबिरास मोटर परिवहन कार्यालय व नवी मुंबई पालिकेच्या मीनाताई ठाकरे रक्तपेढीकडून सहकार्य करण्यात आले.*

# विद्यार्थ्यांसाठी मोफत शिबिर

**नवी मुंबई :** महापालिका क्षेत्रात उच्चभ्रू नागरिक सुट्टीच्या कालावधीत आपल्या मुलांना शुल्क भरून वेगवेगळया शिबिरांमध्ये सहभागी करून घेतात. तथापि सर्वसामान्य मध्यमवर्गीय मुले अशा शिबीरांपासून वंचित राहतात. यादृष्टीने नमुंमपा समाजविकास विभागामार्फत ६ ते १४ वर्ष वयोगटातील मुलांसाठी ४ ते ११ नोव्हेंबर या कालावधीत विनामूल्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये पुस्तक वाचन वर्ग, योगा व फिटनेस वर्ग, हस्तकला वर्ग, वक्तृत्व विकास, चित्रकला वर्ग, व्यक्तीमत्व विकास, नृत्य वर्ग घेण्यात आले. मध्यवर्ती आठ महापालिका शाळांमध्ये हे शिबिर घेण्यात आले. शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. ७६९ विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे धडे घेतले.

# सीकेटी विद्यालयात विज्ञान प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील सीकेटी विद्यालयाच्या इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागातर्फे विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

या प्रदर्शनात शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेत जलचक्र, जलशुद्धीकरण, जलसिंचन, जिओ बोर्ड, ग्लोबल वॉर्मिंग, रेन वॉटर हार्वेस्टिंग, निमल शेल्टर, पाळीव प्राणी व जंगली प्राणी ऊर्जा समस्या व व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, प्रदूषण नियंत्रण, सांडपाणी निचरा तसेच गणितावर आधारीत प्रतिकृती, अशा विविध विषयांवर ५५ प्रतिकृती बनवून विज्ञान प्रयोग सादर केले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे माजी विद्यार्थी डॉ. भूषण साखरदंडे, पालक प्रातिनिधी याच्या हस्ते दिप प्रज्वलन तसेच नारळ वाढवून, फीत कापून विज्ञान प्रदर्शनाचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले डॉ. भूषण यांनी सीकेटी विद्यालयाच्या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक विभागाने आयोजित केलेल्या विज्ञान प्रदर्शनाचा विशेष उल्लेख करून समाधान व्यक्त केले. तसेच विज्ञान प्रदर्शनाच्या आयोजनाने विद्यार्थ्यांचा विज्ञानाकडे बघण्याचा दृष्टिकोन



बदलून त्यांना वैज्ञानिक घडामोडींचा अभ्यास करण्याची आवड निर्माण होते. विज्ञानावर आधारित एखादा प्रकल्प कसा तयार करावा, याची जाणीव त्यांना होते. विद्यार्थ्यांमधून भावी वैज्ञानिक तयार होण्यासाठी बालपणापासूनच वैज्ञानिक दृष्टीकोन असणे गरजेचे आहे, असेही त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात नमूद केले.

शाळेचे विद्यार्थी तसेच त्यांच्या पालकांनी हे विज्ञान प्रदर्शन पाहण्यासाठी गर्दी केली होती. ह्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचा माजी विद्यार्थी डॉक्टर भूषण साखरदंडे, पालक प्रातिनिधी पद्माकर पालव, रामसागर दोनाकोंडा, सोनाली शिंदे यांच्यासह इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मराठी माध्यमाच्या प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा आधुरी, इंग्रजी माध्यमाच्या पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी, शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन अनघा भोसले यांनी केले. विज्ञान प्रदर्शनाचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सीकेटी विद्यालय इंग्लिश मीडियम प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली रीना थळे यांच्यासह इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# खराब हवामानाचा मासेमारीला फटका

## इतरही समस्या भेडसावताहेत; मच्छीमार संकटात

**श्रीवर्धन : बातमीदार**



महाराष्ट्र राज्य सरकारने मच्छिमारांना मासेमारी करण्यासाठी १ ऑगस्टपासून अधिकृतरित्या परवानगी दिली, पण समुद्री वादळांच्या तडाख्यांमुळे गेल्या सिझनमध्ये मच्छीमार हा उद्ध्वस्त झालेला आहे. मच्छीमार आर्थिक संकटात सापडला आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे आणि प्रशासकीय उदासिनता मच्छीमारी व्यवसाय उद्धुस्त झाला असल्याचे मच्छिमारांनाचे म्हणणे आहे. गेल्या वर्षामध्ये होऊन गेलेली वादळे, चक्रीवादळे, अवकाळी पावसाच्या नुकसानातून बाहेर निघत नाही तोच आता समुद्रातील नैसर्गिक बदलामुळे मासेमारी नीट होत नाही. दैनंदिन होणारा खर्च हा वाढतच चालल्याने मच्छीमारांची आर्थिक कोंडी झाली आहे. डिझेल, बर्फ, रेशनिंग, खलाशीवर्गाचा पगार हे निघत नसल्याने मच्छीमार अस्वस्थ झाला आहे.

दक्षिणेकडील खराब हवामानामुळे तर मासेमारी व्यवसाय होत नाही. उलट बोटीचे नुकसान, जाळ्याचे नुकसान याला मच्छीमारांना सामोरे जावे लागत आहे. यामुळे मच्छीमारांवर जणू काही आभाळ कोसळले आहे.

मच्छीमार, कोळी बांधव तसेच मासेमारीवर आधारित असलेल्या छोट्या मोठ्या व्यावसायिकांची फार दयनीय अवस्था झाली आहे. अनेक वेळा समुद्री छोटी मोठी वादळे आले की त्यामुळे मच्छिमारांचे कंबरडे मोडले जाते. आपल्या जीवाची पर्वा न करता ते नौकांना लागणारे डिझेल, बर्फ, ऑईल, भत्ता इत्यादी जीवनावश्यक वस्तू नौकामध्ये घेऊन खोल समुद्रात मासेमारीसाठी जात असताात, पण खोल समुद्रात जाऊनसुध्दा मासे मिळत नासल्याने निराश होऊन अनेक वेळा रिकाम्या हाताने परत फिरावे लागत आहे.

मासेमारी करण्यासाठी समुद्रात जाताना होणारा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे नोकरांचे पगार, डिझेल, ऑईल, भत्ता, जाळी खर्च व कर्जाचे थकलेले हप्ते या सर्व परिस्थितीने मच्छिमारांवर अस्मानी संकट आले आहे.

नेहमीच गजबजलेल्या मच्छिमारांच्या बंदरावर सर्वत्र शुकशुकाट पसरलेला दिसत आहे. कोकणातील मच्छिमारांमुळे कोट्यवधी रुपयांचे परकीय चलन मिळवून देणारा हा मासेमारी व्यवसाय आर्थिक संकटात सापडला आहे. श्रीवर्धन तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील मासेमारी ठप्प झाली आहे. त्यामुळे मच्छीमारांवर उपासमारीची वेळ आली आहे.

# मुरूडमध्ये मोफत नेत्र तपासणी आणि मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**मुरूड : प्रतिनिधी**

अलिबाग येथील आदर्श पतसंस्था आणि लायन्स हेल्थ फाऊंडेशन यांच्या सहकार्याने पतसंस्थेच्या मुरूड शाखेच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन शहरातील कल्याणी हॉस्पिटलजवळील आदर्श पतसंस्थाचे प्रांगणात करण्यात आले होते. या शिबिराचा तब्बल १०१ जणांनी लाभ घेतला.

शिबिरावेळी मुरूड आदर्श पतसंस्था शाखेचे रिजनल मॅनेजर केदार वैद्य, मॅनेजर सुप्रिया काळबेरे, अंकित भुसाणे, अनिकेत भोसले, डॉ. हर्षद गोरे, डॉ. तेजल कवळे, डॉ. नितेश म्हात्रे, डॉ. श्रावणी म्हसळकर, प्राची केरले, अभय भोईर आदी उपस्थित होते. या शिबिरात मुरूड शहरासह पंचक्रोशी भागातील १०५ जणांनी नेत्र तपासणी करून आपला सहभाग नोंदवला. त्यातील ३० जणांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.




# पर्यावरणवादी स्वाती टिल्लू यांची चौल, रेवदंड्याला सदिच्छा भेट

**रेवदंडा : प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धनाचे काम करणाऱ्या स्वाती टिल्लू यांची चौल व रेवदंडा येथे सदिच्छा भेट दिली. त्या नवी मुंबईतील ऐरोली येथे राहत असून त्यांनी चौल येथे येऊन माहिती देत मार्गदर्शन केले.

स्वच्छता करण्यासाठी सध्या बाजारात उपलब्ध असलेल्या रासायनिक द्रव्यांना नैसर्गिक पर्याय म्हणजे बायो एन्झाईम. लिंबूवर्गीय फळांच्या सालांपासून अशा प्रकारचे बायो एन्झाईम घरच्या घरी बनविता येते. बायो एन्झाईमचा वापर वाढल्यास रसायनांमुळे होणारे प्रदूषण थांबविता येईल. पर्यावरण संवर्धनाचे काम करणाऱ्या संस्था तसेच विविध सामाजिक संस्था आणि महिलावर्गाने पुढाकार घेतल्यास त्या संबंधीचे प्रशिक्षण देण्याचे काम स्वाती टिल्लू करतात. अलिबाग तालुक्यातील निसर्ग आणि जैवविविधतेने नटलेल्या चौल आणि रेवदंडा या जोड गावांना सौ. टिल्लू यांनी भेट दिली. या भेटीत त्यांनी रेवदंडा येथील समुद्रकिनारा तसेच चौल गावातील प्राचीन मंदिरांत दर्शन घेतले. या भेटीत त्यांनी चौल येथील निसर्गप्रेमी संस्थेच्या कार्यकर्त्यांना भेटून ग्रामस्थांना बायो एन्झाईमविषयी प्रशिक्षण देण्यासंदर्भात इच्छा व्यक्त केली. चौल येथील विविध प्रकारच्या वनस्पतींचा संग्रह असलेल्या राईलकरवाडीसही सौ. टिल्लू यांनी भेट दिली.



# महापरिनिर्वाण दिनानिमित्त मध्य रेल्वेच्या अनारक्षित विशेष गाड्या

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबई येथे जाणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी १२ अनारक्षित विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. नागपूर–छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबईदरम्यान ४ विशेष ट्रेन चालतील. एक विशेष ट्रेन कलबुरगि–छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसदरम्यान चालेल.



**विशेष गाड्यांचा तपशील**

(अ) नागपूर–छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई अनारक्षित विशेष (४) विशेष गाडी क्रमांक ०१२६२ नागपूर येथून ४.१२.२०२४ रोजी रात्री ११.५५ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे दुसऱ्या दिवशी दुपारी ३.३० वाजता पोहचेल. विशेष गाडी क्रमांक ०१२६४ नागपूर येथून ५.१२.२०२४ रोजी सकाळी ०८.०० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे त्याच दिवशी रात्री ११.४५ वाजता पोहचेल. विशेष गाडी क्रमांक ०१२६६ नागपूर येथून ५.१२.२०२४ रोजी दुपारी ०३.५० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे दुसऱ्या दिवशी सकाळी १०.५५ वाजता पोहचेल. या गाड्यांना अजनी, सेवाग्राम, वर्धा, पुलगाव, धामणगाव, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, जलंब, मलकापूर, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड, नाशिकरोड, इगतपुरी, कसारा, कल्याण आणि दादर. हे थांबे देण्यात आले आहेत.

विशेष गाडी क्रमांक ०२०४० नागपूर येथून ७.१२.२०२४ रोजी दुपारी ०१.२० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे दुसऱ्या दिवशी पहाटे ०४.१० वाजता पोहचेल. या गाडीला अजनी, वर्धा, पुलगाव, धामणगाव, बडनेरा, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, नाशिक रोड, इगतपुरी, कल्याण आणि दादर हे थांबे देण्यात आले आहेत. (सी) कलबुर्गी–छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई अनारक्षित विशेष (१) विशेष गाडी क्रमांक ०१२४५ कलबुरगी येथून ५.१२.२०२४ रोजी संध्याकाळी ०६.३० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ०८.२० वाजता पोहचेल. या गाडीला गणागापूर रोड, अक्कलकोट, सोलापूर, कुर्डुवाडी, दौंड, पुणे, लोणावळा, कल्याण आणि दादर हे थांबे देण्यात आले आहेत. रेल्वेने महापरिनिर्वाण दिनानिमित्त भेट देणाऱ्या प्रवाशांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये यासाठी पुरेशा उपाययोजना केल्या आहेत.

# माणसाने राष्ट्रहितासाठी कर्म करावे -प्रल्हाद पै

**कर्जत : प्रतिनिधी**

माणसाने प्रत्येक कर्म हे राष्ट्रहितासाठी करावे. यासाठीच आमच्या जीवनविद्या मिशनचे घोषवाक्यही प्रत्येक कृती राष्ट्रहिताची, विश्वशांतीची असे आम्ही ठेवले आहे. उद्योजकांनी उद्योग करताना उद्योजक, कर्मचारी, वेंडर आणि ग्राहक यांच्यासोबत समाज आणि निसर्ग या दोन घटकांचाही अवश्य विचार करावा, असे विचार प्रल्हाद वामनराव पै यांनी मार्गदर्शनातून व्यक्त केले.




कर्जत ज्ञानपीठात सुरू असलेल्या आनंद मेळाव्यात उद्योग हाच योग या विषयावर पॉडकास्ट फॉरमॅटवर आधारित चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. यामध्ये उद्योग क्षेत्रातील विविध समस्यांवर प्रल्हाद पै यांनी मार्गदर्शन केले. प्रसिद्ध उद्योगपती समीर भांबेरे आणि रविराज कानडे यांनी या वेळी पै यांना त्यांच्या क्षेत्रातील अनेक प्रश्न विचारले. पै यांनी उत्तरे दिली.

प्रल्हाद पै यांनी पुढे म्हणाले, व्यवसाय करणे म्हणजे समाजाची गरज पुरवणे यासाठीच असा उद्योग निवडा, ज्यातून समाजाची गरज पूर्ण होईल. नवीन उद्योग करताना त्याबद्दल नीट प्लॅनिंग करा, ट्रेनिंग घ्या, व्यवसायातील खाचखळगे जाणून घ्या. यामुळे तुम्हाला व्यवसायात यश मिळवणे सोपे जाईल तसेच व्यवसाय करताना दिवसाचे आठ तास मनापासून काम करा, ज्यामुळे तुम्हाला २४ तास काम करण्याची गरजच लागणार नाही. उद्योगातून पैसा कमवणे हा उद्देश असण्यापेक्षा आनंद मिळवणे हा उद्देश असावा. काम करताना करूणा, कौतुक आणि कृतज्ञता या गोष्टी जर तुमच्याजवळ असतील तर तुम्हाला यशदेखील चांगलेच मिळेल.

थोर तत्त्वज्ञ, समाजसुधारक सद्गुरू वामनराव पै यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील विविध ठिकाणाहून हजारो शिष्यमंडळी सहभागी होत आहेत. दररोज दोन पर्वात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहेत.

पहिल्या सत्रात जीवनविद्या मिशनचे कार्य आयुष्यभर निस्वार्थ कार्य करणाऱ्या शिष्यांना जीनवगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यंदा हा पुरस्कार ज्येष्ठ नामधारक अरविंद पडवळ आणि विश्वस्त दिलीप महाजन यांना देण्यात आला.

## वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात पर्यटक अधिक संख्येने येत असतात. त्याचा वाहतुकीवरही परिणाम होतो. त्यामुळे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी (दि.२९) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २०२ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून एक लाख ९७ हजार रुपये इतका दंड आकारला आहे. वाहतूक पोलिसांच्या या सुरू असलेल्या धडक कारवाईमुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

# वणव्यांमुळे जैवविविधता धोक्यात!

## पशुपक्ष्यांचे जाताहेत बळी; वने, मालमत्तेचीही वाताहत

**पाली : प्रतिनिधी**

पश्चिम घाटाचा विस्तीर्ण पट्टा, विपुल जैवविविधता व डोंगरदऱ्यांनी वेढलेला आणि ऐतिहासिक वारशांचा ठेवा म्हणून रायगड जिल्हा ओळखला जातो, मात्र येथे वारंवार लागणाऱ्या मानवनिर्मित व काही प्रमाणात नैसर्गिक वणव्यामुळे जैवविविधता, वनसंपदा व पशू–पक्ष्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. शिवाय मालमत्तादेखील नष्ट होते.

सध्या ठीकठिकाणी वणवे लागण्यास सुरुवात झालेली आहे. पावसाळ्यात जिल्ह्यातील डोंगर, माळरान, किल्ले, गड, जंगल या सर्व ठिकाणी मोठ्या प्रमाणात छोटी झुडपे व गवत उगवते. पावसाळ्यानंतर ही झुडपे व गवत सुकते आणि अशा माळरान, डोंगर व शेतात सुकेल्या झुडप व गवताला नैसर्गिकरीत्या वणवा लागतो, तर काही लोक कळत–नकळत आग लावतात. या आगीचे रुपांतर प्रचंड नैसर्गिक व कृत्रिम वणव्यात होते. दरवर्षी जिल्ह्यात हजारो हेक्टर क्षेत्रावर असे वणवे लागतात. परिणामी या आगीत झाडे–झुडपे, पशू–पक्षी, सूक्ष्मजीव तसेच सरपटणारे प्राणी यांचा जळून मृत्यू होऊन सजीवसृष्टीवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. जिल्ह्यातील विविध ऐतिहासिक वास्तू आणि किल्ल्यांवरील हे वणवे या ऐतिहासिक वस्तूंनादेखील नुकसान पोहचवत आहेत. सध्या अशा वनव्यांना मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली आहे. गवत जळल्याने गवतावर अवलंबून असणाऱ्या गुरे–ढोरांवर उपासमारीची वेळ येते. मोठ्या प्रमाणात सजीवसृष्टीचे नुकसान होते. या वणव्यांवर नियंत्रण आणणे अत्यंत गरजेचे आहे. संबंधित विभागाने व नागरिकांनीसुद्धा ही बाब गंभीरतेने घेऊन तत्काळ उपायोजना करणे आवश्यक आहे.

### ◆ सजीवसृष्टीची हानी

*नैसर्गिक व कृत्रिम वणव्यांमुळे सजीवसृष्टी धोक्यात येते. पर्यावरणाची प्रचंड हानी होते. प्रदूषण वाढते. महत्वपूर्ण जैवविविधता संपुष्टात येते. सरपटणारे जीव, (घोरपड, साप, सरडे, विंचु इत्यादी) किटक आणि झाडे–झुडपे, औषधी वनस्पती आगीमध्ये भस्मसात होतात. फुलपाखरांना त्यांचे अन्न मिळविता येत नाही. विविध प्राण्यांचे व पक्षांचे आसरे–निवारे संपुष्टात येतात. त्यांची पिल्लेदेखील या आगीत होरपळून मरतात. पक्ष्यांचे आणि गुरे–ढोरांचे अन्न नष्ट झाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ येते. दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींनादेखील या आगीमुळे धोका संभवतो.*

### ◆ ऐतिहासिक वास्तू, किल्ल्यांचे नुकसान

*वणव्यांमुळे जिल्ह्यातील अनेक छोटे–मोठे गड–किल्ल्यांचे व ऐतिहासिक ठेव्यांचे बांधकाम कमकुवत होऊन ते ढासळण्याची भिती असते. किल्याच्या तटबंदीवर, बुरुजांवर उगवलेले गवत जळाल्यामुळे त्यांचे नुकसान होते. वणवे लागल्यामुळे किल्ले व ऐतिहासिक वास्तूंवरील मोठ्या प्रमाणात वनसंपदादेखील नष्ट होत आहे. त्यामुळे येथे राहणाऱ्या पशूपक्ष्यांची अन्नपाण्यासाठी फरफट होत आहे. येथे राहणारे मोर, माकड व भेकर हे प्राणी अन्न पाण्यासाठी दाहीदिशा भटकतात. या पार्श्वभूमीवर वणवे लागणार नाहीत याची दक्षता व खबरदारी सर्वांनीच घेतली पाहिजे.*

### ◆ ठोस उपाययोजनांची गरज

*कृत्रिम वणव्यांमुळे संपूर्ण सजीवसृष्टी धोक्यात येते. पर्यावरणाचा ऱ्हास होतो. वणवे रोखण्यासाठी वनविभागाच्या माध्यमातून विविध उपाय व जनजागृती केली जाते तसेच काही वेळेला विद्यार्थी पथनाट्य सादर करतात, मात्र हे प्रयत्न अपुरे आहेत. या उपयांबरोबरच स्थानिक लोकांना व आदिवासींना वणव्याचे दुष्परिणाम सांगून त्यांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. यासाठी गाव समिती निर्माण केली पाहिजे. प्रामुख्याने वनविभाग, निसर्गप्रेमी व आदिवासी विद्यार्थ्यांच्या मदतीने जनजागृती करण्याची गरज आहे. दृकश्राव्य माध्यमांद्वारे वनव्यांमुळे होणारी हानी सर्वांसमोर आणली गेली पाहिजे. लोकांनीदेखील स्वयंस्फूर्तीने वणवे रोखणे व स्वतः लावणार नाही यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. याबाबत वन विभागाच्या माध्यमातून प्रबोधन व जनजागृती करत असल्याचे कोलाड येथील पर्यावरण व वन्यजीव रक्षक सागर दहिंबेकर यांनी सांगितले.*

**बहुतांश वणवे हे मानवनिर्मित असतात. नोव्हेंबर अखेरपासून व मार्चनंतर पानगळ सुरू झाल्यावर या दोन वेळा जिल्ह्यात वणवे लागतात. या वेळी पक्ष्यांचा विणीचा हंगाम असतो. त्यामुळे पक्षी, त्यांचा अधिवास, त्यांची पिल्ले आणि अंडी नष्ट होतात तसेच वणव्यामुळे महत्वाची जैवविविधता धोक्यात येते. वणवे रोखण्यासाठी वन विभागाकडून जनजागृती व प्रबोधन केले जाते. अत्याधुनिक फायर ब्लोअरद्वारे वणवे विझविले जातात. जाळरेषा काढली जाते.**

**–समीर शिंदे,** वनक्षेत्रपाल, अलिबाग

# पेणमध्ये साईबाबांचा भव्य पालखी सोहळा

**पेण : प्रतिनिधी**

पेणमध्ये ओम साई पदयात्रा मित्र मंडळाच्या वतीने आयोजित भव्य दिव्य पालखी सोहळ्याने पेणमध्ये भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. साई मंदिर येथून सायंकाळी ढोल ताशाच्या व वरळी बिट्स ब्रॉसबँड पथकाच्या तालावर व आकर्षक विद्युत रोषणाईत या पालखी सोहोळ्याला सुरुवात झाली.




या पालखी सोहळ्यात तीन चलचित्रे सादर करण्यात आली. यामध्ये द्वारकामाई मंदिर, बैलगाडी हाकताना साईबाबा, हुबेहुब दिसणारे साईबाबा यांचा विशेष समावेश होता. साईबाबांच्या मिरवणुकीची संपूर्ण पेण शहरात परिक्रमा काढण्यात आली.

साईबाबांच्या पालखी मिरवणुकीची सुरुवात प्रांताधिकारी प्रवीण पवार, तहसीलदार तानाजी शेजाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन टोम्पे, पोलीस निरीक्षक संदीप बागुल, वडखळ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे, दादर सागरी प्रभारी अधिकारी नागेश कदम, अपघातग्रस्तांचे मदतगार कल्पेश ठाकूर यांच्या हस्ते व हजारो महिलांच्या उपस्थितीत साईबाबांची महाआरती घेऊन करण्यात आली.

पेण साई मंदिरापासून फटाक्यांच्या आतषबाजीत सुरू झालेला पालखी सोहळा तेरा घरांची आळी, चावडी नाका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, नगर परिषद चौक, राजू पोटे मार्ग, कोळीवाडा, बाजारपेठ, छत्रपती शिवाजी महाराज चौक, कासार आळी, हनुमान आळी आणि पुन्हा साई मंदिर येथे वाजत गाजत आला. पालखी मार्गावर सर्वत्र भगवे पताके, भगवे झेंडे लावण्यात आले होते. हजारोंच्या संख्येने महिलावर्ग व पेणकर या पालखी मिरवणुक सोहळ्यात सहभागी झाले होते. कोळीवाड्यात महिला मंडळ भक्तिमय वातावरणात नाचण्यात दंग झाल्या होत्या.

या वेळी भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत पालखी मिरवणूक पेण शहरात फिरल्यानंतर साईबाबांच्या महाआरतीने व महाप्रसादाने मिरवणुकीची सांगता करण्यात आली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजता साईबाबांची पालखी पायी चालत शिर्डीकडे मार्गस्थ झाली.

गेली १६ वर्ष ओम साई पदयात्रा मित्र मंडळ पेण ते शिर्डीपर्यंत साई पालखीची सेवा करत आहेत. पेण येथून निघालेली ही बाबांची पालखी ६ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता शिर्डीत पोहचणार आहे तसेच ९ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता पेण चिंचपाडा येथील सेंच्युरीयन पार्क या ठिकाणी साईंचा भंडारा होणार आहे.

पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी ओम साई पदयात्रा मित्र मंडळाचे सर्वेसर्वा कल्पेश ठाकूर, मितेश भानुशाली व त्यांचे २०० सभासद गेला महिनाभर दिवस रात्र मेहनत घेत आहेत.

## जागतिक पॅरा तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धा

# भारताचा ऐतिहासिक विजय

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

बहरीनमधील इसा स्पोर्ट सिटी, हॉलडी, रिफा येथे जागतिक पॅरा तायक्वांदो संघटनेतर्फे पहिली जागतिक पॅरा तायक्वांदो पुमसे अजिंक्यपद स्पर्धा २०२४ आयोजित करण्यात आली होती. २०२८मध्ये लॉस एंजलस, अमेरिका येथे होणाऱ्या पॅरालिम्पिक स्पर्धेत यातील खेळ प्रकार समाविष्ट आहेत. भारताच्या पॅरा तायक्वांदो संघाने ऐतिहासिक कामगिरी करत देशाचे नाव जागतिक स्तरावर उज्ज्वल केले आहे.




इंडिया तायक्वांदो या जागतिक तायक्वांदो संघटनेशी संलग्न भारतीय तायक्वांदो संघातर्फे रायगड, नवी मुंबईतील २६ खेळाडूंसह प्रशिक्षक, फिजिओ, पदाधिकारी सहाय्यक असे एकूण ४६ सदस्य या स्पर्धेसाठी बहारीनमध्ये दाखल झाले होते. भारतीय संघाने उत्कृष्ट कामगिरी करत चार सुवर्ण, पाच रौप्य व आठ कांस्यसह एकूण १७ पदके पटकावली. विशेष बाब म्हणजे भारतीय संघाने पहिल्यांदाच सांघिक विजेतेपद आपले नाव कोरले.

आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक तुषार सिनलकर यांची या प्रतिष्ठित स्पर्धेसाठी भारतीय संघाचे प्रशिक्षक म्हणून निवड झाली होती. त्यांनी संघाला मार्गदर्शन करत ऐतिहासिक विजय संपादन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

इंडिया तायक्वांदोचे अध्यक्ष व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे सचिव नामदेव शिरगावकर यांनी संघप्रमुख वीणा अरोरा, सर्व प्रशिक्षक, सहकारी, फिजिओ डॉ. संहिता पूर्णपात्रे आदी सदस्यांचे हार्दिक अभिनंदन केले.

मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर स्वागत करण्यासाठी तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रतर्फे आंतरराष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक सिद्धेश घाग (मुंबई), राष्ट्रीय पंच व प्रशिक्षक तसेच गुरुकुल तायक्वांदो अकॅडमीचे प्रमुख रोहित सिनलकर (रायगड), राष्ट्रीय पंच व प्रशिक्षक हिमांशू हेरंब (पालघर) याशिवाय गुरुकुल तायक्वांदो अकॅडमीचे ओंकार गिरे, प्रेम पाटणे, चैतन्य नागने, आशिष राडिये, राज जाधव आदी उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत खेळाडू चमकले

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत नवी मुंबई जिल्हास्तरीय शालेय कराटे स्पर्धेत येथील युनिव्हर्स कराटे मार्शल आर्ट्स अकॅडमीचे खेळाडू चमकले. त्यांनी पाच सुवर्ण, चार रौप्य आणि दोन कांस्य अशी एकूण ११ पदके पटकावली आहेत.

या स्पर्धेत १०८ शाळांमधून ५७५ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये १४, १७ आणि १९ वर्षाखालील कराटेपटू मुले व मुलींचा समावेश होता.

सुवर्णपदक विजेत्यांमध्ये ईश्वरी पानसरे, सोहम साळुंखे, स्वरा कदम, शरण्या पिंगळे, दर्शन पानसरे; तर रौप्यपदक विजेत्यांमध्ये मिहीर पालकर, आयुष मालुंजकर, रुद्रा पाटील, भावेश चौधरी आणि कांस्यपदक विजेत्यांमध्ये कराटेपटू पार्थ सूर्यवंशी, निलय पिंगळे यांनी बाजी मारली आहे.

या खेळाडूंना ग्रँडमास्टर शिहान शिवाजी ढवळे, शिहान शंकर शेलार, सेन्सई महेश दाभाडे, सायली सरवणकर, सोहम सरवणकर, सचिन औताडे, सिध्देश सरवणकर, उदय शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.




# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत, अकोला जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने अकोला येथे राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी यश मिळविले.




इयत्ता अकरावीमध्ये शिकत असलेल्या अल्फिया शेहजाद अन्सारी हिने १९ वर्षाखालील ८१ किलोवरील वजनी गटात रौप्यपदक, तर बारावी वाणिज्यमधील अविक सुमंता मुखर्जी याने ६९ किलोखालील वजनीगटात कांस्यपदक पटकावले. त्यांना क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील व संभाजी जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, कार्यकारी मंडळाचे सदस्य संजय भगत, स्कूल कमिटी सदस्य प्रभाकर जोशी, प्राचार्य निशा नायर यांनी त्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

## स्व. धर्मवीर आनंद दिघे चषक क्रिकेट स्पर्धा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कोपरखैरणे गावात दरवर्षीप्रमाणे यंदाही धर्मवीर आनंद दिघे चषक २०२४ क्रिकेट स्पर्धेचे सलग २३व्या वर्षी आयोजन करण्यात आले आहे. या वेळी स्पर्धा १ गट म्हणजेच ग्रामीण नवी मुंबईतील आठ संघ आणि शहरी आठ संघ असणार असल्याचे आयोजक प्रविण म्हात्रे यांनी कळविले आहे.

या स्पर्धेत पारितोषिक विजेत्या संघाला दोन लाख रुपये व चषक आणि उपविजेत्याला एक लाख रुपये व चषक आहे. मालिकावीरासाठी एलईडी टीव्ही देण्यात येणार आहे. स्पर्धा कोपरखैरणे सेक्टर २३ येथील भुमिपुत्र मैदानात २३, २४ व २५ डिसेंबर रोजी खेळवली जाणार आहे. या स्पर्धेत १६ संघातील १९२ खेळाडू कसब पणाला लावतील.

स्पर्धा यशस्वीतेसाठी जय भवानी मित्र मंडळ,बाल शिवाजी व्यायाम मंडळ, गावातील सर्व क्रिकेट संघ, ४०+ कोपर खैरणे तसेच अजिंक्य पाटील, सतीश रावत, चेतक पाटील, नंदन म्हात्रे, स्वप्नील पाटील आदी मेहनत घेत आहेत.

# सह्याद्री विद्यालयाच्या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या सह्याद्री विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय व इंग्रजी शाळेच्या शाखांचे क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन निवृत्त उपसंचालक संजय महाडिक तसेच बांधकाम व्यावसायिक दिनेश राठोड यांच्या हस्ते झाले.

या वेळी प्रमुख पाहुणे संजय महाडिक यांनी बोलताना शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात यशस्वी खेळाडू बनण्यासाठी प्रयत्न करावे. मी एसएससी परीक्षेत नापास असतानाही क्रीडा क्षेत्राकडे विशेष लक्ष दिल्याने या पदापर्यंत पोहचण्याचा मान मिळाला, असे सांगितले.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करण्यात आली. विद्यार्थ्यांना खेळाडू वृत्तीबाबत शपथ देण्यात आली तसेच संविधानाचे वाचन करण्यात आले. व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम, सह्याद्री विद्यालयाचे अध्यक्ष संजय पाटील, देवन्हावे विद्यालय अध्यक्ष भास्कर लांडगे, जितेंद्र रावळ, दत्ता दांगट, अमोल शहाणे, रवी नायडू, शिक्षक पालक संघाचे शिंदे उपस्थित होते.

दरम्यान प्रमुख पाहुणे संजय महाडिक यांनी कुस्तीसाठी मॅट दिले व दिनेश राठोड यांनी २१ हजार रुपये अर्थसहाय्य केले. पाहुण्यांचा परिचय शेखर देशमुख यांनी, प्रास्ताविक सह्याद्री शाळेच्या मुख्याध्यापिका जे. व्ही पाटील यांनी केले, तर उपस्थितांचे आभार इंग्रजी शाळेच्या मुख्याध्यापिका धनश्री ठकेकर यांनी मानले. उद्घाटन समारंभाला शाळेतील शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच पालक उपस्थित होते.



# नवीन पनवेल येथे दिव्यांगांची जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा

**पनवेल : वार्ताहर**

३ डिसेंबर हा जागतिक अपंग दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून रायगड जिल्हा परिषद दिव्यांग कल्याण विभाग आणि डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन बौद्धिक अक्षम मुलांची विशेष शाळा यांच्या सयुक्त विद्यमाने दिव्यांगांच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन ३ डिसेंबर रोजी नवीन पनवेल येथील बांठिया स्कूलच्या मैदानावर करण्यात आले आहे.

या क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून दिव्यांगाना प्रोत्साहन मिळावे याकरिता दिव्यांगांच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून रायगड जिल्ह्यातील दिव्यांगांच्या १६ शाळा या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. त्यांचे चार गट करण्यात आले आहेत. त्यामध्ये बौद्धिक अक्षम (गतिमंद) ६ ते १२ वयोगट, १३ ते १६ वयोगट, १७ ते २१ वयोगट, २२ ते २५ वयोगट यांच्यासाठी धावणे, स्पॉट जंप, सॉफ्ट बॉल थ्रो, गोळा फेक, लांब उडी हे खेळ घेण्यात येणार आहेत. प्रवर्ग कर्णबधिर वयोगट ६ ते १२, १३ ते १६, १७ ते २१, २२ ते २५ यांच्यासाठी धावणे, लांबउडी, गोळाफेक या क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. सुमारे २५० दिव्यांग क्रीडा स्पर्धक विद्यार्थी व १५० शिक्षक, कर्मचारीवर्ग स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

या वर्षी विशेष बाब म्हणजे बहुविकलांग विद्यार्थ्यांसाठी मनोरंजनाच्या खेळाचे आयोजन करण्यात येणार आहे. रायगड जिल्हा परिषदचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे व जिल्हा समाजकल्याण अधिकारी शामराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा यशस्वी करण्यासाठी नियोजनाची जबाबदारी नवीन पनवेल येथील डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाऊंडेशनच्या बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेकडे सोपविण्यात आली आहे. या आगळ्यावेगळ्या स्पर्धा पाहण्यासाठी नागरिकांनी उपस्थित राहून दिव्यांग खेळाडूंना प्रोत्साहन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, ४ डिसेंबरला पालकांकरिता मार्गदर्शनपर व्हिडीओ पाठवणे, ५ डिसेंबरला जनजागृती रॅली, ६ डिसेंबरला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करणे, ७ रोजी माहितीपत्रके वाटप व जनजागृती करणे आणि तारा गाव येथील युसुफ मेहेर अली सेंटरला भेट, १० रोजी आनंद मेळाव्याचे आयोजन आहे.

# मुंबईचा राजा रोहित शर्मा!

## ऑस्ट्रेलियात चाहत्यांकडून घोषणाबाजी, हिटमॅनचीही दाद



**कॅनबेरा : वृत्तसंस्था**

भारतीय संघ सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असून बॉर्डर-गावसकर ट्रॉफीचे सामने खेळत आहे. ऑस्ट्रेलियाच्या पर्थमधील बालेकिल्ल्यात भारताने 'कांगारू'ना पराभूत करत इतिहास रचला. भारतीय संघाचा नियमित कर्णधार या सामन्यात उपस्थित नव्हता. भारतीय संघ आता दुसऱ्या कसोटीपूर्वी सराव सामना खेळण्यासाठी कॅनबेरा येथे आहे. या दरम्यानचा रोहितचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

रोहित शर्मा १५ नोव्हेंबर रोजी दुसऱ्यांदा बाबा झाला. त्यामुळे आपल्या दुसऱ्या मुलाचा जन्मानंतर रोहित कुटुंबाबरोबर वेळ घालवण्यासाठी मुंबईतच राहिला. त्यामुळे पहिला कसोटी सामना खेळू शकला नाही. भारतीय संघ पर्थ कसोटीनंतर दोन दिवसीय गुलाबी चेंडूचा सराव सामना खेळण्यासाठी कॅनबेरामध्ये दाखल झाला. तेव्हाचा रोहितचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

रोहित भारतीय संघाच्या टीम बसमध्ये बसलेला दिसत आहे, तर टीम बसच्या बाहेर भारतीय संघाचे चाहते गोळा झाले आहेत आणि ते बाहेरूनच मुंबईचा राजा रोहित शर्मा असे नारे देताना दिसत आहे. तर रोहित शर्मा चाहत्यांचे नारे ऐकून थोडासा बुजल्यासारखा होते, मान खाली घालतो आणि मग अंगठा दाखवून चाहत्यांना प्रतिक्रिया देतो.

### दुसरी कसोटी ६ डिसेंबरपासून

भारत ऑस्ट्रेलियामधील दुसरा कसोटी सामना ६ ते १० डिसेंबरदरम्यान ॲडलेडमध्ये खेळवला जाणार आहे. हा गुलाबी चेंडूचा सामना असून रात्र दिवस कसोटी सामना असणार आहे. या सामन्यापूर्वी शुबमन गिल पुन्हा फिट होऊन भारतीय संघात परतण्याची चिन्हे आहेत, तर ऑस्ट्रेलिया संघाला जोश हेझलवूडच्या रूपात मोठा धक्का बसला आहे. दुसऱ्या कसोटीतून हेझलवूड दुखापतीमुळे बाहेर झाला आहे. त्याच्या जागी सीन ॲबॉट आणि ब्रेंडन डॉगेट यांना संघात दाखल करून घेतले आहे.




# आयपीएलमध्ये अनसोल्ड राहिलेल्या जॉनी बेअरस्टोची तुफान फटकेबाजी

**अबू धाबी : वृत्तसंस्था**

सौदी अरेबियातील जेद्दाह येथे झालेल्या आयपीएल २०२५ मेगा ऑक्शनमध्ये अनेक मोठे खेळाडू विकले गेले नसले तरी जॉनी बेअरस्टोचे अनसोल्ड राहणे आश्चर्यकारक राहिले. इंग्लंडच्या या स्फोटक यष्टीरक्षक फलंदाजावर कोणत्याही संघाने बोली लावली नाही. आयपीएल २०१९ आणि २०१४मध्ये शतके झळकावूनही या टॉप ऑर्डर फलंदाजाला कोणीही विकत घेतले नाही. याच बेअरस्टोने अबू धाबी टी-१० लीगमध्ये अवघ्या ३० चेंडूत ७० धावांची नाबाद खेळी साकारली.



अबू धाबी टी-२० लीगच्या २८व्या सामन्यात टीम अबू धाबीचा सामना मॉरिसविले सॅम्प आर्मीशी झाला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना सॅम्प आर्मीने निर्धारित १० षटकात १०९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात यजमान अबु धाबी संघ संघर्ष करत असताना जॉनी बेअरस्टोने तुफान फटकेबाजी केली. जबरदस्त पॉवर हिटिंग करताना ३५ वर्षीय अनुभवी बेअरस्टोने मैदानाच्या प्रत्येक कोपऱ्यात शॉट्स लगावले.

अबुधाबी संघाला १० षटकांत ४ बाद १०६ धावांपर्यंतच मजल मारता आली, ज्यामुळे संघ विजयापासून फक्त चार धावा दूर राहिला. या वेळी बेअरस्टो नॉन-स्ट्राइक एंडवर उभा होता, तर दुसऱ्या टोकाला स्ट्राइक असलेला फलंदाज धावा करू शकला नाही.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com